


अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि.२७ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १५० वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## पुण्यात मतदारांचा निरुत्साह

**पुणे** : पुण्यात कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीसाठी आज मतदान पार पडले. मात्र या मतदानाकडे पुणेकरांनी पाठ फिरवल्याचे दिसले. कसबा विधानसभा मतदार संघात पाच वाजेपर्यंत ४५.२५ टक्के मतदान पार पडले तर चिंचवड विधानसभा मतदार संघासाठी ४१.१ मतदान पार पडले. आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर चिंचवडमध्ये तर आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर कसब्यात पोटनिवडणूक होत आहे. चिंचवडमध्ये सकाळी ७ ते ९ या वेळेत ३.५२ टक्के, ९ ते ११ या वेळेत १०.४५ टक्के. ११ ते १ या वेळेत २०.६८ तर १ ते ३ या वेळेत ३०.५५ टक्के मतदान झाले आहे. कसबा पेठ मतदारसंघात सकाळी ७ ते ९ या वेळेत ६.५ टक्के, ९ ते ११ या वेळेत ८.२५ टक्के. ११ ते १ या वेळेत १८.५० तर १ ते ३ या वेळेत ३०.०५ टक्के मतदान झाले होते.

# कांदा रस्त्यावर, पेन्शन वाऱ्यावर सरकारच्या तोंडाला 'फेस' येणार



सुराज्य/मुंबई

**राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात होत आहे.अधिवेशन म्हटल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात वादाची ठिणगी नेहमीच पडत असते. शिवसेना आणि धनुष्यबाण मिळाल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आमदारांची छाती चार इंचाने फुगली आहे तर अस्तित्वच गमावल्याने उद्धव ठाकरे यांच्या आमदारांचे अवसान गळाले आहे.त्यामुळे सरकारवर तुटून पडण्याची ताकत केवळ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दिसत आहे. अजितदादांनी तशी चुणूक पूर्वसंध्येला दाखवूनही दिली आहे.कांद्याचे दर गडगडल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आहे तर पेन्शनची घोषणा अद्यापही वाऱ्यावर आहे.एसटीच्या कर्मचाऱ्यांचा वेतनासाठी आक्रोश सुरू आहे.पीक विम्याची फसवणूक,नियमित कर्जफेडीचे प्रलंबित अनुदान या सर्व प्रश्नांचे अस्त्र विरोधकांच्या हाती असल्याने अधिवेशन काळात शिंदे-फडणवीस सरकारच्या तोंडाला फेस येणार, असे दिसते.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांना अपात्र ठरविण्याच्या मागणीवर उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयातील आपला युक्तिवाद पूर्ण केला आहे. आता शिंदे यांच्या शिवसेनेकडून बाजू मांडून झाल्यानंतर न्यायालयाचा निकाल अपेक्षित आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची प्रतीक्षा असली तरीही केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे यांच्या पक्षाला शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह दिल्याने त्यांचा आत्मविश्वास दुणावला आहे.

न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती दिलेली नाही; तथापि, शिवसेनेच्या वतीने ठाकरे गटाविरोधात व्हिप लागू करणार नाही, अशी न्यायालयात तोंडी हमी दिल्याने तूर्त ठाकरे गटाची अधिवेशनात व्हिपपासून सुटका झाली आहे. तूर्त विधानसभेत शिवसेना हा एकच विधिमंडळ पक्ष असला तरीही ठाकरे गटाचे विधानसभेतील १६ आमदार विरोधी बाकावरच बसणार आहेत.

ऐन अधिवेशनाच्या तोंडावर सरकारी कर्मचारी आणि शिक्षक जुन्या पेन्शन योजनेसाठी आक्रमक झाले आहेत. जुनी पेन्शन योजना लागू करावी म्हणून सरकारी, निमसरकारी तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी १४ मार्चपासून संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. उपमुख्यमंत्री तसेच अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात जुनी पेन्शन योजना लागू करणे अशक्य असल्याचे सांगितले होते. मात्र, शिंदे यांनी कोकणात झालेल्या शिक्षक अधिवेशनात जुन्या पेन्शन योजनेसाठी सरकार सकारात्मक असल्याचे सांगत, त्याबाबत समिती स्थापन करण्याची घोषणा केली. त्यामुळे जुन्या पेन्शनचा मुद्दा चांगलाच गाजण्याची शक्यता आहे. राज्यात कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आल्याने विरोधी पक्ष या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेऊ शकतो.

### दोन हात करण्याचे आदेश...

उद्धव ठाकरे यांनी आपल्या आमदारांना विधिमंडळात जनतेचे प्रश्न आक्रमकपणे मांडून सरकारविरोधात दोन हात करण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसनेही विविध मुद्यांवर सरकारला घेरण्याची तयारी केली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात नवे राज्यपाल रमेश बैस यांच्या अभिभाषणाने होईल. त्यानंतर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात २०२२-२३ या वर्षाच्या पुरवणी मागण्या सादर केल्या जातील.

### लोकप्रिय घोषणांचा पाऊस...

अर्थ आणि नियोजन मंत्री या नात्याने फडणवीस हे प्रथमच राज्याचा २०२३-२४ या वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेत मांडतील. भाजप आणि समर्थक आमदारांची संख्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेपेक्षा जवळपास तिप्पट असण्याने अर्थसंकल्पात भाजपला झुकते माप मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय आगामी महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका लक्षात घेता अर्थसंकल्पात लोकप्रिय घोषणांचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील वर्षी लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होतील. त्यामुळे शिंदे सरकारला पुढील वर्षी लेखानुदान मांडावे लागेल. त्यानंतर विधानसभा निवडणुकीचे वारे वाहणार असल्याने २०२४-२५ चा अर्थसंकल्प हा निवडणूक अर्थसंकल्प असेल. येत्या ९ मार्च रोजी सादर होणारा अर्थसंकल्प एका अर्थाने शिंदे सरकारसाठी शेवटचा अर्थसंकल्प आहे.

### चहात सोन्याचे पाणी घालताय का?



शेतकऱ्यांच्या ताटात संकटाचा कडू घास मग चहापानाचा गोडवा कशाला? अशा शब्दात संताप व्यक्त करत विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सरकारच्या चहापानावर बहिष्कार घातला.पत्रकारांशी बोलताना त्यांनी सरकारच्या उधळपट्टीवर जोरदार हल्ला चढवला. मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' बंगल्याचे ४ महिन्यांचे खानपानाचे बिल २ कोटी ३८ लाख रुपये आले आहे. 'वर्षा'वरच्या चहामध्ये काय सोन्याचे पाणी घातले जायचे काय? असा संतप्त सवालही पवार यांनी मुख्यमंत्र्यांना केला. आम्हीही उपमुख्यमंत्री म्हणून काम केलेय. माझे अनेक जवळचे सहकारी मुख्यमंत्री होते, पण त्यांच्या शासनकाळात असे कधी बघायला मिळाले नाही, असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या कामावर नाराजी व्यक्त केली. जाहिरातींवर ५० कोटी सरकारने खर्च केले आणि मुंबई महापालिकेचे १७ कोटी रुपये सरकारने जाहिरातींवर खर्च केले आहेत. आपले हसरे चेहरे दाखवण्यासाठी ही उधळपट्टी सुरू असल्याची टीका पवार यांनी केली.

# उदयशंकर यांच्या हाती लवकरच फुलणार कमळ



सुराज्य/सोलापूर

हिंदुत्वाचे कट्टर पुरस्कर्ते संभाजी भिडे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू आ. श्रीकांत भारतीय यांच्या भेटींमुळे सोलापूर शहर आणि जिल्ह्यात चर्चेत आलेले उदयशंकर पाटील यांनी आता राजकीय दृष्टीने आणखी एक पाऊल पुढे टाकत असल्याचे दिसून येत आहे. पुढची राजकीय दिशा आणि धोरण ठरवण्यासाठी त्यांनी आपल्या समर्थकांची बैठक बोलावली होती. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पाटील यांनी हिंदुत्ववादी विचाराशी समरस असलेल्या राजकीय पक्षाबरोबर जावे, असा सूर आळवला. त्यामुळे उदयशंकर यांच्या हाती लवकरच कमळ फुलण्याचा विश्वास त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जातोय.

काही वर्षांपूर्वी सोलापूरच्या राजकारणात दरारा निर्माण करणारे उदयशंकर हे सध्या राजकीय विजनवास सहन करत आहेत. सन २००४मध्ये सुशीलकुमार शिंदे यांच्याविरुद्ध दक्षिण सोलापूर तालुका विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत त्यांनी जबरदस्त फाईट दिली होती. त्यावेळी तब्बल त्यांनी २८ हजार मते घेतली होती. त्यामुळे दक्षिण तालुक्याला एक युवा नेता मिळणार अशी त्यावेळी चर्चा होती.एवढेच नव्हेतर शिंदे समर्थक पैसे वाटत असल्याचा प्रसंग समोर आणून त्यांनी शिंदे समर्थकांना घाम फोडला होता. पुढे काही कारणांमुळे ते राजकारणापासून अलिप्त राहिले.

पाटील घराण्याकडे राजकारणाबरोबरच सामाजिक कार्याचा वसाही आहे.रविकांत पाटील यांनी शेजारच्या इंडीमध्ये जाऊन आमदारकी प्राप्त केली होती.उदयशंकर यांनी दादाश्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून आपले सामाजिक कार्य सुरू ठेवले. गेल्या काही महिन्यांपासून ते राजकारणात उतरतील, अशी चर्चा सुरू होती. त्यांचे समर्थक वेळोवेळी सोशल मीडियाद्वारे ते स्पष्ट करत होते. नुकत्याच काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू आणि आगामी लोकसभेची जबाबदारी ज्यांच्यावर दिली आहे, असे आमदार श्रीकांत भारतीय यांनी उदय पाटील यांच्या घरी भेट दिली व त्यांना थेट भाजप प्रवेश प्रवेशाचे आमंत्रण दिले. त्यापूर्वीही संभाजी भिडे यांनीही उदय पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली होती त्यावरूनच उदय पाटील हे हिंदू विचाराशी समरस असलेल्या पक्षाबरोबर जाणार हे स्पष्ट झाले होते. ते शहर उत्तर मधून आपले नशीब अजमावणार की शहर दक्षिणची वाट धरणार याबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. एकंदरीत पाहता उदय पाटील हे भाजपची जवळीक साधणार हे जवळपास निश्चित होत आहे.

## ९ मार्चला इरादा स्पष्ट करणार

### आशीर्वाद लाभला

शनिवारी झालेल्या बैठकीत मागील काही राजकीय घडामोडींवर व सद्य स्थितीवर प्रदीर्घ व विस्तृत चर्चा झाली. येणाऱ्या काळात 'प्रखर हिंदुत्व' व हिंदू धर्म रक्षणासाठी पाटील गटाने आपले प्रामाणिक श्रम व योगदान द्यावे, असे ज्येष्ठांकडून सुचविण्यात आले. पाटील घराण्याचे हिंदू धर्म वृद्धी कार्य पाहता हिंदुत्ववादी विचाराशी समरस असलेल्या राजकीय विचारधारेशी आपल्या पाटील गटाची मोट बांधावी व आपण पुढील वाटचाल करावी, अशा शब्दात ज्येष्ठांनी उदयशंकर यांना आशीर्वाद दिला.

### ९ मार्चला काय ते सांगेन?

आता लवकरच शहर जिल्ह्यात आर. पी. ग्रुप आणि दादाश्री प्रतिष्ठानच्या वतीने बैठक घेणार आहे. त्या बैठकीत कार्यकर्त्यांचा काय विचार आहे ते जाणून घेऊन ९ मार्च रोजी आपण कोणत्या पक्षात जायचे त्याचा निर्णय घेणार असल्याचे उदयशंकर पाटील यांनी रविवारी दैनिक सुराज्यशी बोलताना सांगितले.



रविवारी सकल हिंदू समाजातर्फे सोलापुरात विराट हिंदू जनगर्जना मोर्चा काढण्यात आला. त्यामध्ये सहभागी तरूण. (वृत्त पान ३)

# टेंभुर्णी येथे परिचारिकेचा रुग्णालयात भाजून मृत्यू; डॉक्टराविरुद्ध गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

पगार मागण्यासाठी रुग्णालयात आलेल्या परिचारिकेसोबत वाद घालत असताना पेटत्या अगरबत्तीच्या ठिणगीने स्पिरिटचा भडका होऊन भाजून परिचारिका मयत झाली होती. या प्रकरणात टेंभुर्णीच्या पोलिसांनी अमीर बशीर मुलाणी (रा.फूट जवळगाव (ता. माढा) या डॉक्टरांविरुद्ध मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ४ फेब्रुवारी २०२१ रोजी टेंभुर्णी येथील सह्याद्री हॉस्पिटल मध्ये घडली होती.

या संदर्भात मयत झालेली परिचारिका जयश्री संदीप थूल (वय ३८, रा. हडपसर, जि.पुणे) यांचे बंधू आशिष वाघमारे (रा. हिंगणघाट जि.वर्धा) यांनी नुकतीच टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली.त्यांची बहीण जयश्री भुल या टेंभुर्णी येथील सह्याद्री हॉस्पिटल मध्ये परिचारिका म्हणून कामास होत्या. त्यांचे थकीत वेतन मागण्यासाठी त्या ४ फेब्रुवारी २०२१ रोजी दुपारी मुलाणी यांच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये आल्या होत्या. त्यावेळी डॉ. मुलांनी पैसे देण्यास नकार देऊन त्यांना बदनामीची धमकी दिली होती. वाद होत असताना अचानक रुग्णालयात ठेवलेल्या स्पिरिटचा भडका होऊन जयश्री भाजल्या होत्या. त्यानंतर डॉक्टर मुलानी यांनी त्यांना पुणे येथील ससून रुग्णालयात दाखल केले होते. उपचारा दरम्यान त्या मयत झाल्या.या संदर्भात पुणे येथील फरासखाना पोलिसात अकस्मात मयत अशी नोंद झाली होती. या प्रकरणाची पोलीस चौकशी करीत असताना मयताचे बंधू आशिष वाघमारे यांनी नुकतीच पोलिसात फिर्याद दाखल केली. आपल्या बहिणीला डॉक्टर मुलानी यांनी उशिराने खाजगी वाहनातून दाखल केले. त्याच्या निष्काळजीपणा मुळे आपल्या बहिणीचा मृत्यू झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तपास सहाय्यक निरीक्षक गिरीश जोग करीत आहेत.

# थट्टा भोवली, मार्केट कमिटी गडबडली, शेवटी कारवाई केली

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांनी चेंडू आपल्या कोर्टात ढकलला आहे !!

सुराज्य/सोलापूर

सुराज्य Impact

**दहा पिशव्यांच्या कांदा विक्रीपोटी शेतकऱ्याला दोन रुपयांचा चेक देणाऱ्या सोलापूर बाजार समितीतील आडत व्यापाऱ्याविषयी सर्वस्तरातून तीव्र संताप व्यक्त झाला. त्यानंतर माध्यमातूनही टीकेची झोड उठल्यानंतर सोलापूर बाजार समितीचे प्रशासन खडबडून जागे झाले. व्यापाऱ्याच्या या कृतीवर ठपका ठेवत बाजार समितीच्या प्रशासनाने संबंधित व्यापाऱ्याचा आडत परवाना १५ दिवसांसाठी निलंबित केला आहे.**

बार्शी तालुक्यातील बोरगाव येथील शेतकरी राजेंद्र चव्हाण यांनी १७ फेब्रुवारीला सोलापूर बाजार समितीत सूर्या ट्रेडिंग या आडत व्यापाऱ्याकडे दहा पिशव्या कांदा विक्रीस आणला होता. त्यांच्या कांद्याचे वजन ५१२ किलो भरले. त्यात प्रतिकिलो अवघा एक रुपया इतका दर त्यांना मिळाला. त्यानुसार ५१२ रुपयांची पट्टी त्यांना मिळाली. पण त्यातून पुन्हा हमाली, तोलाई, मोटारभाडे आदी ५०९.५१ पैसे खर्च वजा जाता २ रुपये ४९ पैसे शिल्लक उरले. पण उरलेले हे पैसे शेतकऱ्याला देण्यासाठी संबंधित व्यापाऱ्याने चक्क दोन रुपयांचा चेक दिला. त्यावर कडी म्हणजे हा चेक पंधरा दिवसांनी वटेल, अशी तारीख त्यावर टाकून दिली होती.

'दै.सुराज्य'ने यासंबंधीचे सविस्तर वृत्त २४ फेब्रुवारीच्या अंकात ठळकपणे प्रसिद्ध करून त्या शेतकऱ्याच्या वेदनेवर आवाज उठवला.त्यानंतर व्यापाऱ्याच्या या असंवेदनशील कृतीबाबत सर्वच स्तरातून संताप व्यक्त झाला. बाजार समितीने संबंधित व्यापाऱ्याला खुलासा मागितला. पण संगणकीकृत कामकाजामुळे अशा पद्धतीचा चेक तयार झाला आणि घाईगडबडीत ही चूक झाल्याचे व्यापाऱ्याकडून उत्तर देण्यात आले. पण हा खुलासा समाधानकारक नसल्याने बाजार समितीचे सचिव चंद्रशेखर बिराजदार यांनी संबंधित व्यापाऱ्याचा आडत परवाना दि.२४ पासून १५ दिवसांसाठी निलंबित करण्याची कारवाई केली. शेतकऱ्याला २.४९ पैशाचा चेक देणे व्यापाऱ्याला भोवले आहे.


सुराज्य
epaper.surajyadigital.com
24 Feb 2023 - Page 7
५१२ किलो कांदा विकून हातात पडला
फक्त २ रुपयाचा चेक
कृषी उत्पन्न बाजार समितीमधील प्रकार
कांद्याचे दर घसरल्याने बळीराजाच्या 'डोळ्यात पाणी'

### परवाना कायम स्वरूपी निलंबित करा.

शेतकरी आपला शेतीमाल बाजार समितीत विक्री घेऊन येतो. त्यामुळे त्यांच्या जिवावर अनेक जणांना रोजगार उपलब्ध होतो. यामध्ये व्यापारी, हमाल,तोलाईदार त्यांचा उदरनिर्वाह चालतो. २ रूपये ४९ पैशाचा चेक देवून त्यावर 'कडी' म्हणजे तो चेक पुढील १५ दिवसाचा वटला जाईल अशी तारीख टाकणाऱ्या व्यापाऱ्याचा परवाना १५ दिवसासाठी नाही तर कायमस्वरूपी निलंबित केला पाहिजे. अशी कडक भूमिका बाजार समिती प्रशासनाने घेतली पाहिजे. जेणेकरून यापुढे तरी कोणताही व्यापारी शेतकऱ्यांची थट्टा करणार नाही. अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

### सभापतींच्या भूमिकेकडे लक्ष...

जिल्ह्यातील दाउतपूर येथील शेतकरी बंडू भांगे यांनी १ फेब्रुवारी रोजी ८२५ किलो कांदा बाजार समितीमधील एस.एन जावळे या अडतदाराकडे विक्रीस पाठविला होता.त्यांची पट्टी ८२५ रुपये झाली आणि हमाली, तालाई सह खर्च ८२६ रूपये ४६ पैसे झाल्याची पट्टी तयार केली व कहरच कहर करीत संबंधित शेतकऱ्यांला मायनस १ रूपयाची पट्टी हातात दिली. शेतकऱ्यांची अशी थट्टा करणाऱ्या व्यापाऱ्यांचा परवाना कायमस्वरूपी निलंबित करण्याचा अधिकार सभापतींना असल्याचे सांगण्यात येते.त्यामुळे सभापती आ.विजय देशमुख हे याबाबत काय भूमिका घेणार?याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागून आहे.

# तिसऱ्या आघाडीची भीती

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वारूला रोखण्यासाठी तिसऱ्या आघाडीचा प्रयोग करण्याचा प्रयत्न भाजपेतर पक्षांकडून बोलून दाखवला जात आहे. मोदी हे दुसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर विरोधक धास्तावून गेले. दुसऱ्या वेळेस सत्ता हाती घेतल्यानंतर मोदींना आता हटवण्याशिवाय गत्यंतर नाही, असे म्हणत तिसरी आघाडी स्थापन करण्याला वेग आला. त्यात प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी लिडिंग घेतले होते. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र, गोवा व बिहार आदी राज्यांचा दौरा करून त्यासाठी चाचपणीही केली परंतु त्यात त्यांना यश आले नाही. अरविंद केजरीवाल आणि के. चंद्रशेखर राव यांचे त्यासाठीचे प्रयत्न सुरू आहेत. पण म्हणावा तितका प्रतिसाद त्यांनाही मिळत नाहीय. आघाडीबाबत बॅनर्जी आज गप्प आहेत. नितीश कुमार यांच्याकडे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून पाहिले जात आहे. त्यांना मुख्यमंत्रिपदाचीच काळजी लागली आहे. स्वकीयांचे बंड आणि तेजस्वी यादव यांचे वाढते प्रस्थ त्यांना त्रासदायक ठरत आहे. आघाडी बनवायची झाली तर सर्व पक्षांनी एकत्र आले पाहिजे. आघाडी करणारे नेते बलवान असायला हवेत. विशेष म्हणजे त्यांच्यात एकी हवी व विचार समान हवेत. तेच होत नसल्याने केंद्रीय सत्तेत यापूर्वीही आघाडीच्या राजकारणाचे बारा वाजले आहेत. छत्तीसगडमधील रायपूर येथील काँग्रेसच्या अधिवेशनात तिसऱ्या आघाडीविषयी पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा (एनडीए) २०२४ मधील लोकसभा निवडणुकीत पराभव करायचा असेल तर समविचारी पक्षांनी तातडीने एकत्र येण्याची गरज आहे. बिगरभाजप पक्षांच्या एकजुटीसाठी काँग्रेस सर्वतोपरी प्रयत्न करेल. विरोधकांची तिसरी आघाडी मात्र भाजपाच्या फायद्याची ठरेल, असा इशारा काँग्रेसने राजकीय प्रस्तावात दिला आहे.



खरगे यांनी विरोधकांच्या महाआघाडीसाठी काँग्रेस पुढाकार घेत असल्याचे संकेत नागालँडच्या प्रचारसभेत तसेच, दिल्लीतील पक्षाच्या कार्यक्रमातील भाषणात दिले होते. हाच मुद्दा त्यांनी महाअधिवेशनात शनिवारच्या भाषणातही अधोरेखित केला. २००४ ते १४ या वर्षांमध्ये मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली किमान समान कार्यक्रमाच्या आधारे काँग्रेसने संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकार यशस्वीपणे चालवून दाखवले होते. 'यूपीए'मध्ये समविचारी पक्षांचा समावेश होता, आता ही आघाडी आणखी सशक्त करण्याची गरज आहे. भाजपा आणि संघाविरोधात लढण्याची इच्छा असलेल्या सर्व राजकीय पक्षांना सोबत घेऊन संघर्ष करण्याची काँग्रेसची तयारी आहे. देश आत्ता अत्यंत कठीण परिस्थितीतून जात असून, काँग्रेस पक्षच देशाला सक्षम आणि ठोस नेतृत्व देऊ शकतो, असेही खरगे म्हणाले.त्यांची ही विधाने खोटी म्हणताच येणार नाहीत. कारण जनता परिवारातील नेत्यांनी आघाडीचा प्रयोग करून केंद्रात कसा धुमाकूळ घातला हे देशाने पाहिले आहे. त्यानंतर यूपीएचे सरकार आल्यानंतर देशाला दिशा मिळाली हे वास्तव आहे. माकप आणि समाजवादी हे पक्ष भक्कमपणे काँग्रेसच्या पाठीशी उभे होते मात्र, आता राजकीय परिस्थिती बदलली आहे. अखिलेश यादव, मायावती यांची शक्ती क्षीण झाली आहे. दक्षिणेतील द्रमुक पक्षही काँग्रेस सोबत जायला तयार नाही. केंद्रातील भाजपा सरकारविरोधात काँग्रेसने एकट्याने लढण्याचे दिवस संपले असल्याची कबुली माजी पक्षाध्यक्ष राहुल गांधी यांनी दिली होती. विरोधी पक्षांशी जुळवून घेऊन भाजपाविरोधात लढण्यास काँग्रेस तयार आहे, पण जनतेला पर्यायी धोरण दिले पाहिजे, असेही त्यांनी निक्षून सांगितले होते. बिगरभाजप विरोधी पक्षांची महाआघाडी करण्याची भूमिका काँग्रेसने मांडली असली तरी, तृणमूल काँग्रेस, आम आदमी पक्ष, भारत राष्ट्र समिती, समाजवादी पक्ष अशा अनेक बिगरभाजप प्रादेशिक पक्षांनी काँग्रेस आघाडीला विरोध केला आहे. गेल्या महिन्यामध्ये या पक्षांच्या नेत्यांची तिसरी आघाडी स्थापन करण्यासंदर्भात हैदराबादमध्ये बैठकही झाली होती. भारत राष्ट्र समितीचे प्रमुख के. चंद्रशेखर राव, 'आप'चे प्रमुख अरविंद केजरीवाल तसेच तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार तसेच शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचीही भेट घेतली होती. शरद पवार यांनी काँग्रेसशिवाय विरोधकांची महाआघाडी होऊ शकत नाही, असे स्पष्ट केले असले, तरी काँग्रेस व तृणमूल काँग्रेस या दोन्ही पक्षांनी मेघालयच्या प्रचारामध्ये एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केल्यामुळे विरोधकांच्या संभाव्य महाआघाडीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्वबळावर लढण्याचा आत्मविश्वास काँग्रेसमध्ये दिसत नाही. समविचारी पक्ष काँग्रेसची हाक ऐकायला तयार नाहीत. काँग्रेसची एकूणच कोंडी होते आहे. आघाडीमुळे तिरंगी लढत होईल. त्याचा भाजपलाच फायदा होईल. खरगे म्हणतात ते खरे आहे. त्यांनी आघाडीबाबत व्यक्त केलेली भीती अनाठायी म्हणताच येणार नाही.

मराठी भाषा दिन

# ...मराठी भाषेला विसरू नका

**'मराठी भाषेचा गोडवा' हा जगावेगळा असल्याचे जगजाहीर आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी साहित्याचा मानदंड वि. वा. शिरवाडकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाला आगळे वेगळे महत्त्व असून या दिवसाला जागतिक मराठी भाषा दिवस, मराठी भाषा गौरव दिन म्हणूनही साजरा केला जातो.**

मराठी भाषेतील अग्रगण्य व श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समीक्षक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ रोजी पुणे येथे झाला. त्यांनी अनेक माध्यमांच्या साहाय्याने मराठी भाषेचा जगभर प्रसार करून मराठी भाषेचे नावलौकिक केले व गौरवान्वित केले. त्यामुळेच जगातील मराठी भाषिक २७ फेब्रुवारीला 'जागतिक मराठी दिवस' म्हणून साजरा करतात. मराठी भाषेचा गोडवा हा जगावेगळा आहे. मराठी भाषा सोज्वळ आणि सोपी असल्याने कोणीही तिला सहज अवगत करू शकते. महाराष्ट्राची मातृभाषा ही भारतासह संपूर्ण जगाला वेगळाच आनंद प्रदान करीत असते. मराठी भाषेत महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आहे. याची जोपासना करण्याचे दायित्व संपूर्ण मराठी भाषिकांवर आहे. मराठी माणसाचे कर्तव्य बनते की, मराठी भाषा जगातील माणसाच्या ह्रदयात व रक्तात कसे रुजविता येईल, याकडे सर्वांचे लक्ष असले पाहिजे. कारण ही मराठी भाषेची भूमी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, साधू-संत, थोर महात्मे, क्रांतिकारक, समाजसुधारक यांच्या संकल्पनेतून व संस्कारातूनच मराठीचा उगम झालेला आहे. मराठी भाषेला जीवित ठेवण्याचे काम वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी संपूर्ण ताकदीनिशी केले आणि जगभरात मराठीचा डंका वाजविला. त्यामुळेच त्यांच्या जन्मदिनी म्हणजे २७ फेब्रुवारीला जागतिक 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाला जगातील संपूर्ण मराठी भाषिक मराठी भाषा गौरव दिवस म्हणून साजरा करतात. आपल्या पूर्वजांनी मराठी भाषेचा गौरव वाढविण्यासाठी व मराठीचा ठेवा मजबूत करण्यासाठी संपूर्ण ताकद लावली. परंतु आत्ताची नवीन पिढी मराठीचे मूळ शब्दच विसरल्याचे दिसून येते. आई-बाबा, काका-काकू, मामा-मामी, आजी-आजोबा या शब्दाचा विसर पडून मम्मी-पप्पा, अन्टी, डॅडी, ग्रँडफादर-ग्रँडमदर इत्यादी इंग्रजी शब्द मराठी भाषेत घर करताना दिसत आहे. यामुळे मराठी भाषेतील अमृतवाणी नष्ट होऊ शकते. याला नाकारता येत नाही.

भारतात २८ राज्य ८ केंद्रशासित प्रदेश आहेत. यामुळे भारताचा विचार केला तर १९५०० हून अधिक मातृभाषा आहेत. त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेसह अनेक भाषा आहेत. त्या शिकाव्या व अवगत कराव्यात परंतु आपल्या मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी मुख्यत्वेकरून आजच्या पिढीने घेतली पाहिजे. आपल्यासाठी मराठी भाषा ही गंगेसारखी निर्मळ व तुळशीच्या वृक्षासारखी पवित्र आणि वटवृक्षासारखी अफाट भाषा आहे. त्यामुळे मराठी भाषेचा जेवढा प्रचार करतात येईल तेवढा केलाच पाहिजे. मातृभाषा मराठी ही आईची भूमिका बजावीत असते तर राष्ट्रभाषा हिंदी ही वडिलांची भूमिका पार पाडते.





भारतात १९५०० पेक्षा अधिक मातृभाषा आहेत. परंतु या संपूर्ण भाषेमध्ये सोपी, सोज्वळ, मधुर आणि सहज अवगत होणारी एकमेव भाषा म्हणजे मराठी भाषा. त्यामुळे आजच्या नवीन पिढीला मी कळकळीची विनंती करतो की आपल्या मायबोली मराठीला न विसरता त्याची जोपासना केली पाहिजे. यातच महाराष्ट्राचा आणि मराठी भाषिकांचा गौरव आहे. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल असे घोषित झाले. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिनी साजरा केला जातो. मराठी भाषा महाराष्ट्रासाठीच नाही तर संपूर्ण जगाला सुशोभित करणारी भाषा आहे. मी नवीन पिढीला आग्रह करेल की कमीत कमी मराठी वृत्तपत्रे नेहमीच्या वाचनात आणावी यामुळे मराठी भाषेचा मान उंचावेल. त्याचप्रमाणे मराठी भाषेला जिथे-जिथे रुजविता येईल, तिथे-तिथे रुजवून मराठी भाषेला प्रज्वलित करण्याचे काम आधुनिक युगात नवीन पिढीने केले पाहिजे. महाराष्ट्रातील कोणत्याही धर्माचा व्यक्ती असो किंवा पंथाचा व्यक्ती असो तो मराठीचा सन्मानच करतो.परंतु मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने मराठीला जगभरात कशी सूर्यासारखी तेजस्वी करता येईल याकडे संपूर्ण मराठी भाषिकांनी लक्ष दिले पाहिजे व मराठी भाषेचे नाव सुवर्ण अक्षरात कोरल्या गेले पाहिजे. याच मराठी भाषेने पोवाडा, कीर्तन, भजन, भारूड, लावणीच्या माध्यमातून इंग्रजांना सळो की पळो लावले व समाजजागृतीचे काम केले. आपण ज्या मातीत जन्म घेतला आणि ज्या भाषेच्या बळावर लिहिण्याचे मोठे झालो. अशा मराठी भाषेचा प्रवास न थांबता संपूर्ण जगात झाला पाहिजे. तेव्हाच मराठी भाषेची मान आणखी उंचावेल व कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल असे मला वाटते. ज्या मातीत आपण जन्म घेतला, तेथील भाषेची पूजा अर्चना व्हायलाच पाहिजे. कारण ती आपणा सर्वांसाठी पूजनीय आहे. आज दक्षिण भारतातील मातृभाषेचा विचार केला तर ती इतरांसाठी बोलायला व वाचायला अवघड व कठीण वाटते. त्यामुळे या भाषांचा प्रसार जास्त होऊ शकला नाही. परंतु आज मराठी भाषा जगभरात ऐकायला व पाहायला मिळते ही आनंदाची व गौरवास्पद बाब आहे. महाराष्ट्रातील मराठी भाषेचा विचार केला तर भारतातील काना-कोपऱ्यातील व्यक्ती सहज अवगत करीत असतो. त्यामुळे देशातील इतर राज्यांतील लोक महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. यामुळेच मुंबईला देशाच्या आर्थिक राजधानीचा दर्जा मिळाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मराठी भाषा सोपी, सोज्वळ, निर्मळ आणि शांत स्वरूपाची आहे. या वैभवशाली महाराष्ट्रातील मराठी भाषा संपूर्ण जगात आकाशातील चांदण्यांसारखी चमकायला पाहिजे.

मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने सर्वांना आग्रह करतो की माय मराठी, माझी मराठी, मी मराठी, मातृभाषा मराठी या पध्दतीने जोपासना व्हायलाच पाहिजे. कारण मराठी भाषा हा आपल्या पूर्वजांचा ठेवा आहे आणि ईश्वरी देण सुध्दा आहे. त्यामुळे मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त कसा करता येईल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे. कारण मराठी भाषेचा इतिहास, संस्कृती, वारसा याला उंच शिखरावर नेण्याची जबाबदारी युवा पिढीवर आहे. कारण जगात अनेक देशांमध्ये मराठी भाषा बोलली जाते. महाराष्ट्रात जर आपण फिरायला निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर अंतरावर आपल्याला मराठी भाषेचा वेगवेगळा गोडवा दिसून येतो. कारण मराठीच्या प्रत्येक शब्दात मधुरता आणि सुसंगतपणा दिसून येतो. भारतासह संपूर्ण जगात सहज आणि सोपी भाषा असेल तर फक्त मराठी भाषा. मराठी भाषा ही महाराष्ट्राचा राष्ट्रीय पक्षी मोराचा तुरा आहे तर जगाचा पिसारा आहे. त्यामुळे या गोडव्यामध्ये कुठेही खिंडार पडणार नाही याची जबाबदारी भारतासह जगातील संपूर्ण मराठी भाषिकांनी घेतली पाहिजे. आज जगात मराठी भाषेचा वेगळा ठसा उमटविण्याची वेळ आली आहे. कारण आज मराठी भाषा नदीच्या प्रवाहासारखी जलदगतीने जगात प्रवेश करीत आहे व तिला समुद्रासारखे अफाट करण्याचे दायित्व संपूर्ण मराठी भाषिकांवर आहे.त्यामुळे मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने आपण शपथ घेऊया की मराठी भाषा जगभर पसरविण्याकरिता आम्ही कटिबद्ध आहोत. मराठी भाषेला माझा मानाचा मुजरा. जगात वाढते प्रदूषण आणि निसर्गाचा होत असलेला ह्रास यामुळे पृथ्वीचे संतुलन दिवसेंदिवस डगमगत आहे. यामुळे भूकंप, त्सुनामी, अति उष्णता, अति थंडी, ग्लेशियर वितळणे, समुद्राची पातळी वाढणे अशा अनेक भयावह घटना होत आहे. याला रोखण्यासाठी निसर्गाला वाचविणे गरजेचे आहे. याकरिता आजच्या दिवशी जगातील संपूर्ण मराठी भाषिकांनी मराठी भाषा दिवसाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखो झाडे लावल्या जातील. यामुळे सर्वत्र हिरवागार गालीचा निर्माण होईल व यामध्ये आपल्याला मराठी भाषेचा वेगळाच आनंद, गोडवा व सुगंध अवश्य दिसून येईल व जगात मराठी भाषेची आगळीवेगळी प्रतिमा पाहायला मिळेल आणि जगात एक चांगला संदेश जाईल.

**- रमेश लांजेवार,**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**

टुडेज् ब्लॉग

# अभिजात मराठी...!

भाषा फक्त संवादाचे माध्यम नसते तर ती प्रत्येक व्यक्तीची अस्मिता असते. प्रत्येकाला आपल्या भाषेवर गर्व आणि अभिमान असतो आणि तो असलाही पाहिजे. मराठी, सकल महाराष्ट्र जनाची मायभाषा आहे. मराठी भाषेचा इतिहास प्रदीर्घ आणि प्राचीन आहे. जवळजवळ १५०० वर्षाचा इतिहास मराठी भाषेचा आहे. म्हणूनच मराठी भाषा अभिजात आहे व तिला सरकारी कागदोपत्री देखील अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी सकल मराठी जणांची मनीषा आहे. कोकणच्या किनारपट्टी पासून विदर्भाची काळी माती मराठीचा इतिहास आळवते. मुकुंदराजानी विवेकसिंधु हा मराठीतील पहिला ग्रंथ लिहिला. त्या नंतर मराठी भाषेत अनेक प्रकारच्या रचना लिहल्या गेल्या. वारकरी संप्रदायाच्या इमारतीची पायाभरणी करणारे संत ज्ञानेश्वर माऊली मराठीची महती सांगताना म्हणतात,

माझा मराठीची बोलू कौतुके।
परि अमृतातेहि पैजासी जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन्।।

अर्थातमाझा मराठीचा बोल (शब्द) मला कौतुकाचा वाटतो. अमृताशी जरी पैज लावली, तरी माझा मराठीचा बोल ती पैज जिंकेल. कारण अमृता पेक्षा माझ्या मराठी भाषेत गोडवा व माधुर्य अधिक आहे. ज्ञानेश्वर महाराजा नंतर सुरेश भटांनी देखील लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी या कवितेच्या माध्यमातून मराठी भाषेला वेगवेगळ्या प्रकारच्या उपमा देत अलंकृत केले आहे.

मराठी भाषेची विशेषतः म्हटली तर मालवणी, कोकणी, वऱ्हाडी, खानदेशी चा साज जणू तिच्यावर एखाद्या मौल्यवान रत्नाप्रमाणे चढला आहे. मराठी साहित्य अभिजात आणि अजरामर आहे. मराठी साहित्याची सुरुवात विवेकसिंधू पासून जरी झाली असली तरी या साहित्य कुंडात ययाती, देवयानी, मृत्युंजय, पानिपत सारख्या कादंबऱ्या. कुसुमाग्रज, केशवसुत, बालकवी, सारखे कवी तर पु. ल.देशपांडे सारख्या अजरामर लेखकांनी आपली समिधा अर्पण करत मराठीला परमोच्च शिखरापर्यंत पोहचवलं आहे. मराठी भाषा नवरसांची पाणपोई आहे ह्यात वीर रसानी ओतप्रोत पोवाडा, शृंगार रसानी रसवणारी लावणी, करून रसानी युक्त विराणी, भारूड, कीर्तने, ओव्या, भजने, भूपाळी अशी नवरस पाणपोई असली तरी दहाव्या भक्तिरसाणी मानव कल्याण, भूतदया, शिकवणारी संत परंपरा या मराठी भाषेतचं आहे.

मराठी भाषा एखादया खडकासारखी ताठर आहे पण तेवढीच मऊ देखील आहे. बेळगावात अगदी कानडी लयात मराठी बोलणारा आमचा बंधू मराठीवर आई म्हणून प्रेम करतो व तिच्या अस्मितेसाठी जीवाचे रान करतो. असे असले तरी आजची मराठी भाषेची स्थिती काय ? यावर आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. इंग्रजी वर्चस्वाखाली इंग्रजाळल्या आपल्या मराठी समाजाने मराठीला दुय्यम वागणूक देणे सुरू केले. इंग्रजी बोलणे म्हणजे आजच्या ग्लोबल जगात स्टेटस नी जगणे होय असे काही लोकांना वाटायला लागले आहे. कुठेतरी आपण भाषिक अस्मिता विसरत चाललो असे आपणास नाही वाटत का? विल्यम शेक्सपियर च्या साहित्यावर प्रेम करणारी आपली पिढी कुठेतरी नटसम्राट सारखी अजरामर कृती लिहणाऱ्या कुसुमाग्रजांना





मात्र हरवत तर चालली नाही ना या गोष्टीचे परीक्षण करणे गरजेचे आहे.

एकदा मी सहजच मित्राला विचारलं काय रे बरा आहेस ना यावर बघा त्याचं काय उत्तर आल येस ऑल वेल नंतर दुसऱ्या क्षणाला तो मला म्हणाला व्हॉट अबाउट यू मी मात्र उत्तरलो आणि त्याला म्हणालो काय रे तुझ्या घरावरून इंग्रजाचं विमान गेलं होत का? माझे शब्द ऐकून तो खजील झाला असावा. व त्याला माझ्या शब्दांचा भाव कळला असावा म्हणून तो पुढे काहीच बोलला नाही. अशा अनेक घटना तुमच्या जीवनात पण घडून येत असतील पण यावर कानाडोळा न करता जेव्हाच तेव्हा योग्य उत्तर दिलं तर समोरची व्यक्ती दुसऱ्या वेळी चूक करणार नाही.

केंद्र शासनाने २००४ साली भारतीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा बहाल करण्याचा उपक्रम हाती घेतला. त्यानुसार मराठीला अभिजात दर्जा द्यावा अशी लेखी शिफारस केंद्र शासनाने नेमलेल्या भाषातज्ज्ञांच्यासमितीने एकमताने केलेली आहे. मराठी ही आपली भाषा आपल्याला टिकवायची असेल तर तिच्यावर प्रेम करावे लागेल आणि पावलो-पावली आपल्या वाणीतून तिचेच स्वर आळवावे लागेल.

**- दुर्गेश साठवणे. वर्धा.**

# कवीचा सर्जिकल स्ट्राइक

जावेद अख्तर यांनी पाकिस्तानात जाऊन तिथल्या समाजाला ते ऐकवले हे जितके महत्त्वाचे तितकेच ते इथल्या समाजासाठीही महत्त्वाचे आहे.

'पंछी.. नदिया.. पवन के झोके, कोई सरहद इन्हे ना रोके..' इतके अलवार शब्द फिल्मी गाण्यासाठी लिहू शकणारा कवी वेळ पडते तेव्हा समोरच्याला ठणकावून सांगणारी भूमिका घेऊ शकतो, एवढेच जावेद अख्तर यांच्या 'पाकिस्तानातील त्या गाजलेल्या' वक्तव्याचे महत्त्व नाही, तर ते त्यापेक्षाही बरेच अधिक आहे. राष्ट्रवादाच्या तथाकथित कल्पनांनी गेला काही काळ धुमाकूळ घातलेला असताना थेट पाकिस्तानात जाऊन तो देश दहशतवादाची पाठराखण कशी करतो हे सांगणे, तेही ज्यांना आपल्याकडील तथाकथित देशभक्त निव्वळ धर्मापायी कायमस्वरूपी 'दहशतवादी' समजतात, अशा धर्मामधल्या व्यक्तीचे हे धाडसच. तेही आजच्या सामाजिक, धार्मिक ध्रुवीकरणाच्या काळात फार गरजेचे असलेले धाडस. देशातील मुस्लिमांकडे सरसकट एकाच चष्म्यातून बघणाऱ्या काही लोकांनी आपल्या राष्ट्रप्रेमाच्या, देशभक्तीच्या कल्पना चांगला चष्मा लावून तपासून घ्याव्यात ही गरजच त्यातून व्यक्त होते.

देशभरात एकीकडे बेताल वक्तव्यांना आणि सुमारपणाला अक्षरश: ऊत आलेला असताना शब्दांचे नैतिक आणि सामाजिक वजन काय असते, याची उदाहरणे अलिकडच्या काळात अगदी विरळाच आहेत. कोणत्याही समाजाला चार खडे बोल सुनावू शकणारा नैतिक आवाज बनण्याची ताकद कलावंतांमध्ये असते ती अशी. जावेद अख्तर यांनी पाकिस्तानात जाऊन तिथल्या समाजाला ते ऐकवले हे जितके महत्त्वाचे तितकेच ते इथल्या समाजासाठीही महत्त्वाचे आहे.

उर्दू कवी फैज अहमद फैज यांच्या स्मृतिदिनानिमित्त पाकिस्तानात लाहोर येथे आयोजित करण्यात आलेल्या फैज महोत्सवात जावेद अख्तर यांनी केलेल्या वक्तव्याला टाळ्या मिळाल्या असल्या तरी नंतर तिथल्या कलाकारांनी आणि वेगवेगळ्या क्षेत्रांमधल्या लोकांनी जावेद अख्तर यांच्याविरोधात भूमिका नोंदवणे हे अपेक्षितच होते. आपल्या देशात येऊन कुणीतरी आपल्या विरोधात बोलतो आणि आपण टाळ्या कसल्या वाजवतो, यांना मुळात इथे यायला व्हिसा कुणी दिला या पातळीवरच्या त्या प्रतिक्रिया खरे तर वैफल्य व्यक्त करणाऱ्याच आहेत. कारण अख्तर यांनी सुनावलेले खडे बोलच त्या ताकदीचे आहेत. तुम्ही अनेकदा पाकिस्तानात आला आहात. तुम्ही परत जाल तेव्हा तुमच्या लोकांना सांगाल का की, पाकिस्तानी चांगले लोक आहेत?' या प्रश्नावर जावेद अख्तर यांनी सांगितले की, आपण एकमेकांना दोष देणं थांबवलं पाहिजे, त्यामुळे कोणतीही समस्या सुटणार नाही. एकूणच सध्या जे वातावरण तापले आहे ते कमी व्हायला पाहिजे. आम्ही मुंबईकर आहोत, तेव्हा मुंबईवर कशा पद्धतीने हल्ला झाला होता, ते आम्ही पाहिले आहे. ते लोक नॉर्वे किंवा इजिप्तमधून आलेले नव्हते. ते अजूनही तुमच्या देशात मोकाट फिरत आहेत आणि ही खदखद एखाद्या भारतीयाच्या मनात असेल तर त्याचे तुम्ही वाईट वाटून घ्यायला नको.

पाकिस्तानी जनतेला जावेद अख्तर यांच्या या वक्तव्याबद्दल जे काही वाटले असेल ते वाटो; पण भारतात, हिंदू मुस्लीम संबंधांच्या संदर्भात अख्तर यांनी घेतलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. एकीकडे मुस्लिमांना सरसकट देशद्रोही, दहशतवादी



मानायचे, ऊठसूठ मग तुम्ही पाकिस्तानात चालते का होत नाही, असे विचारायचे, त्यांना इथे राहायचे असेल तर त्यांनी दुय्यम नागरिक होऊन राहावे अशी अपेक्षा करायची असेच आपल्याकडील गेल्या काही वर्षांमधले वातावरण आहे, हे कुणीही नाकारणार नाही. तसे मानणाऱ्यांचे प्रतिनिधी पाकिस्तानात जाऊन भले केक कापून येतील, पण सामान्यांच्या पातळीवर दिशाभूल करण्याचे प्रयोग गेली काही वर्षे सुरू आहेत. असे असताना तितक्या सबळ सामाजिक-सांस्कृतिक नेतृत्वाच्या अभावी असेल किंवा आणखी कशामुळे असेल, पण हा देश आमचाही आहे, भारताविरोधात दहशतवादी कारवाया करणाऱ्या पाकिस्तानबद्दल आम्हांलाही तितकाच राग आहे, हे मुस्लीम समाजातूनही यायला हवे तितक्या खणखणीतपणे कधीच आले नाही, हेही तितकेच खरे. ते सगळे जावेद अख्तर यांनी केले. इथल्या 'मुस्लिमांचा मूळ देश' मानल्या जाणाऱ्या पाकिस्तानात जाऊन त्यांना तुमचा देश आम्हांला त्रास देणाऱ्या दहशतवाद्यांना 'आश्रय' देतो हे सांगणे, हा त्यांचा 'मास्टर स्ट्रोक' नाही, तर त्यांची देशभक्ती सिध्द करणारा सर्जिकल स्ट्राइकच आहे. 'हम देखेंगे' असे बजावणाऱ्या फैज यांच्या स्मृतीसोहळ्यात जाऊन तो करणे हा योगायोग मात्र अजिबात नाही.

# माय मराठी

नाशिकचे गौरवस्थान
कुसुमाग्रज आधुनिक कवी
ज्ञानपीठ पुरस्कारार्थी
साहित्यक्रांतीने काव्यास प्रेरणा नवी

सामाजिक आस्था
वृत्ती क्रांतिकारक
शब्दकलेवरील प्रभुत्व
नवयुवकांना प्रेरक
जन्मदिवसाला लाभला
राजभाषा दिवसाचा मान
अग्रगण्य कवी, लेखक यांचा

अनेक पुरस्कारांनी सन्मान
मूळ गांव शिरवाडे
रमले पुण्यभूमी नाशकात
नटसम्राट नाटकाने दिली
नवी ओळख रंगभूमी क्षेत्रात
सरस्वतीच्या मंदिरातील
लखलखले दैदिप्यमान रत्न

सखोल सहानुभूतीने
वास्तवाला भिडण्याचा यत्न
लावा ललाटास टिळा
माझ्या मराठी मातीचा
काव्यपंक्तितून दिसतो
स्वाभिमान माय मराठीचा

**- माणिक शुरजोशी, नाशिक.**

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त...

**'इतकेच मला जाताना सरणावर कळले होते,**
**मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते!'**

या ओळी पहिल्यांदा कानी पडल्या अन् सुरु झाला प्रवास...पुढचं त्याच्या पुढचं आणि न वाचलेलं मागचंसुद्धा बरचसं शोधण्याचा...कारण या ओळी पहिल्यांदा ऐकल्या त्या आनंद अन अस्वस्थता या द्विधा मन:स्थितीतच, पण अस्वस्थेपेक्षा आनंद खचितच जास्त होता! काहीसं वेगळं मिळाल्याचा...या दोन ओळींनं पुढील अनंत प्रवासाची दारे किलकिली केली आणि या रसात आपणही भिजावं असं ठरलं. या ओळी सहज, सोप्या, सुंदर, विलोभनीय, अप्रतिम अशी आपल्याला ज्ञात असलेली बरीचशी विशेषणं लावली तरी चालतील इतपत 'भारी' आहेत. पण ज्या वयात ऐकल्या ते वय कविकल्पनांचे, मनोराज्य रचण्याचे होते पण या ओळी वाचून वाटलं... अगदी आत कुठेतरी सललेलं, रुतलेलं त्यात उमटलं आहे आणि या ओळी मनाला अक्षरश: भिडल्या खूप खोलवर... माझ्या मनीचे हे विचार, त्यातील दाहकता अन आयुष्य-मरण यावर प्रेम करण्याचं भाबडं वय. हे सारं लिहिणारा कवी व त्याच्या कवितांचा शोध सुरु झाला अन् नाव सापडलं 'गझल मेरुमणी-साक्षात् सुरेश भट' 'एल्गार, रुपगंधा, झंझावत, रंग माझा वेगळा' ही सारी संपदा वाचण्याचा सपाटा सुरु झाला अन् मराठीतील अलौकिक खजिना मिळाल्याचा, वाचल्याचा अन् जगल्याचा जो स्वर्गीय आनंद होता, तो 'याचि देही, अन याचि डोळा' प्राप्त झाला. **एकदा केव्हातरी मी वचन कवितेला दिले,**
**'राखरांगोळीस माझ्या गुणगुणावे लागले !'**

असा हा 'गझल' प्रकार मराठीत आहे आणि तो सुरेश भटांनी इतका समृद्धं करून ठेवलाय हे 'गहजब' आणि आपण त्यापासून वंचित राहिलो हे थोडसं वाईटच होतं. वयाच्या १२-१३ व्या वर्षापासून साधारणत: १९४४ पासून भट कविता करू लागले होते. १९५७ मध्ये 'शेवटी' ही त्यांची 'पहिली' गझल होती. सुरेश भटांची 'गझल' ही सुरेश भटांचीच 'गझल' बनली, त्यांची प्रत्येक गझल 'जगण्याचा सार सांगते, आयुष्याचा विसर पाडते इतकी ती असर करते.' त्यांचे मोठेपण शब्दांत मांडणे कठीण, हा संकुचित दृष्टिकोन ठरेल-लिहिणाऱ्याचा आणि वाचणाऱ्यांचासुद्धा...तरीही सुरेश भटांनी 'गझल' आपल्या शब्दसुमनांनी, वज्राहूनही अभेद्य अक्षरशिल्पांनी अजरामर केली त्या लेखणीला प्रतिभेला मानाचा मुजरा!! जगाने, जगण्याने, दु:खाने, दु:ख देणाऱ्याने आपल्याला कितीही छळले तरीही धीर न सोडणारा हा कवी -

**करू नका एवढ्यात चर्चा पराभवाची,**
**रणात आहेत झुंजणारे अजून काही!**

असे सांगणारा आणि आयुष्यालाच आव्हान देणारा एक कलंदर कवी होता, आहे आणि असणारचं...कारण तो ठणकावून सांगत आहे... मराठी भाषा समृध्द आणि गौरवीत करणाऱ्या या सुरेश भट नावाच्या 'गझलगान' ला त्रिवार वंदन......

**- प्रा. देवानंद साळवे, अकलूज.**

# मराठी विकली...

सांग बाळा यात तू नवीन काय शिकलं?
इंग्रजीच्या बाजारात मराठीला विकलं...
आईला मदर तर बहिणीला केलं सिस्टर
गुरुजींच्या हातात होता मराठीतला खडू
आणि इंग्रजीतला डस्टर,
कसं सांगतील पोरं, शाळेत काय शिकलं?.
कारण इंग्रजीच्या बाजारात मराठीला विकलं...
ऋतूला सिझन म्हणत एकानं विचारलं बाईला, बाई!
भर उन्हाळ्यात वॉटरविना मँगोच कसं पिकलं?
कारण इंग्रजीच्या बाजारात मराठीला विकलं...
कुणी म्हणे पावसाळ्यात पडता होता रेन
मी म्हटलं बाजूला हो अंगावर येईल शेन
रागवू नको भाऊ, यात माझं काय चुकलं
कारण इंग्रजीच्या बाजारात मराठीला विकलं
संगीताच्या बाईंनी विचारलं, सिंग म्हणजे काय?
मी म्हटलं जिला दोन शिंग, ती असते गाय
आन्सर माझं ऐकून बाईंचं डोकं उठलं
कारण इंग्रजीच्या बाजारात मराठीला विकलं
इंग्रजीच्या गुरुजींनी शिकवलं
रडताना क्राय तर सुकल्यावर ड्राय
यानेच तर केला माझा भेजा फ्राय
मग रागाला येऊन मी गुरुजीलाच धुतलं
कारण इंग्रजीच्या बाजारात मराठीला विकलं
चेहऱ्याला फेस करता रुप बदलून गेलं
फेसामागचं सुंदर थोबाड ओळखूच नाही आलं
कुणी म्हणे फेस बघून, त्याच्या तोंडावरच थुंकलं
कारण इंग्रजीच्या बाजारात मराठीला विकलं

**- संध्या हेब्बाळकर, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# गोहत्या, लव्ह जिहाद अन् धर्मांतरावर कायदेशीर बंदी घाला

## ● आमदार टी. राजासिंह ठाकूर यांचा केंद्र आणि राज्य शासनाला इशारा
## ● हिंदू गर्जना मोर्चात लोटला हिंदू जनसागर

**सुराज्य/सोलापूर**

गोहत्या, लव्ह जिहाद अन् धर्मांतर या संविधान विरोधी कृत्यांवर आळा घालण्याची गरज आहे. त्यामुळे याबाबत शासनाने त्वरीत कायदा करावा, अशी मागणी तेलंगणा येथील आमदार टी. राजासिंह ठाकूर यांनी केली. हा कायदा झाला नाही तर यांची किंमत केंद्र शासन आणि राज्य शासनास मोजावी लागेल, असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.

लव्ह जिहाद, धर्मांतर विरोधी देशभरात कठोर कायदा करावा, गोहत्या बंदी कायद्याची देशभरात कठोर अंमलबजावणी करावी आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिवस फाल्गुन अमावस्या 'धर्मवीर दिन' म्हणून जाहीर करावा या मागण्यांसाठी रविवारी सकल हिंदू समाजातर्फे सोलापुरात विराट हिंदू जनगर्जना मोर्चा काढण्यात आला. या मोर्चास हजारो हिंदू बांधवांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. मोर्चाचे हुतात्मा चौकात सभेत रूपांतर झाले.त्यावेळी आमदार ठाकूर यांनी हिंदू बांधवांना संबोधित केले. यावेळी हिंदुराष्ट्र सेनेचे संस्थापक धनंजय देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

पांजरापोळ चौकातील छत्रपती श्री शिवरायांच्या मूर्तीस पुष्पहार घालून मोर्चास प्रारंभ झाला. मोर्चाच्या अग्रभागी भगवा ध्वज घेतलेली अश्वारूढ हिंदू भगिनी होत्या. त्यामागे हजारो हिंदू भगिनी आणि त्यांच्या पाठीमागे हजारो हिंदू बांधव घोषणा देत चालत होते.

'लव्ह नही-जिहाद है, सोची समजी साजिश है , जय भवानी जय शिवराय, हिंदू धर्म कि जय, लव जिहाद विरोधी कायदा झालाच पाहिजे, धर्मांतर विरोधी कायदा झालाच पाहिजे, सोलापुरातील गोहत्या थांबलीच पाहिजे, छत्रपती शिवाजी महाराज कि जय, धर्मवीर संभाजी



महाराज की जय, भारतमाता की जय, हिंदू धर्म की जय' अशा घोषणा देण्यात येत होत्या.

हा मोर्चा बाळीवेस, टिळक चौक, मधला मारुती, माणिक चौक, दत्त चौक, सावरकर मैदान, सुभाष चौक, सरस्वती चौकमार्गे चार हुतात्मा पुतळा येथे पोहचला. मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. प्रेरणा मंत्राने सभेची सुरुवात झाली.

यावेळी व्यासपीठावर ह. भ. प. रामकृष्ण महाराज वीर, प्रा. नलिनी वायाळ, रंगनाथ बंकापूर, संतोष कुलकर्णी, अंबादास गोरंटला उपस्थित होते. सोलापुरातून शेकडो हिंदू मुली गायब झाल्या आहेत. हे रोखण्यासाठी धर्माचे काम आपल्या घरापासून सुरु करा. त्याकरिता दररोज एक तास धर्मासाठी द्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे होऊन हिंदू धर्माच्या रक्षणासाठी तयार राहण्याचे आवाहन आ. ठाकुर यांनी केले

हिंदुराष्ट्र सेनेचे संस्थापक धनंजय देसाई म्हणाले, भारत देश हिंदूंचा होता. आहे आणि भविष्यातही राहणार आहे. धर्म नष्ट करणाऱ्याचा प्रतिकार करणे हे प्रत्येक हिंदूचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. हिंदूराष्ट्र निर्माण होणे आवश्यक आहे.

त्यामुळे केंद्र शासनाने देशाला हिंदूराष्ट्र घोषित करावे, अशी मागणीही देसाई यांनी यावेळी केली. शिवाजी महाराज हे हिंदू धर्मरक्षकच होते, असे त्यांनी ठणकावून सांगितले यावेळी ह. भ. प. रामकृष्ण महाराज वीर, प्रा. नलिनी वायाळ, रंगनाथ बंकापूर, संतोष कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. ध्येयमंत्राने सभेचा समारोप करण्यात आला.

मोर्चामध्ये सहभागी झालेल्या हिंदू बांधवांनी भगव्या टोप्या, भगवी उपरणे परिधान केले होते तसेच हजारोंच्या संख्येने भगवे ध्वज फडकवण्यात येत होते. त्यामुळे वातावरण भगवे झाले होते.

-----------------------------------

लव्ह जिहाद अन् धर्मांतरावर आपल्या परिवाराची न लाजता चर्चा करा. सर्वांना सांगा. लव जिहाद काय आहे. कशासाठी केला जातो. याबाबत जनजागृती करण्याचे आवाहन देखील उपस्थित हिंदू बांधवाना केले.

-----------------------------------

सोलापुरातून ही पहिली ठिणगी पडली आहे. याची दखल घेऊन केंद्र शासन आणि राज्य शासनाने कायदा करावा अन्यथा लव्ह जिहादचे प्रकरण झाल्यास ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजानी महिलांवर अन्याय करणाऱ्यांचे हात कलम केले होते. ते कृत्य छत्रपतीचा मावळा पुन्हा करेल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

-----------------------------------

छत्रपती संभाजी नगर आणि धाराशिव हे नामांतर नव्हे तर शुद्धीकरण आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी मोगलाच्या नावाने शहर आहेत त्यांची नावे बदलत शुध्दीकरण केले जाईल. हैद्राबादचे देखील भाग्यनगर असे नामांतर केले जाणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.



## भाजपाने जोरदार प्रचार यंत्रणा राबवून विजयश्री खेचून आणली : डॉ. सावंत

**अक्कलकोट** : सन २०२१-२२ मधील गोवा राज्यातील विधानसभा निवडणुकिंच्या काळात मये' विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रेमेंद्र सेठ यांना निवडून आणण्याकरिता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि गोवा राज्याचे प्रभारी देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वातील टीम श्रीक्षेत्र अक्कलकोट भाजपाने जोरदार प्रचार यंत्रणा राबवून विजयश्री खेचून आणल्याचे प्रतिपादन गोवा मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांनी व्यक्त केले. ते अक्कलकोटला आले असता त्यांनी आवर्जुन आमदार कल्याणशेट्टी यांच्या सोलापूर रस्त्यावरील विवेकानंद पार्क येथील पद्मालय' या निवासस्थानी टीम भाजपाची भेट घेवून कौतुक केले. मुख्यमंत्री ना.सावंत यांच्या समवेत विशेष कार्याधिकारी यशवंतराव कामत, भालचंद्र सावंत उपस्थित होते. यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, राजेंद्र बंदीछोडे, प्रदिप पाटील, नागनाथ कुंभार, लखन झंपले, ऋषीकेश लोणारी, अंकुश चौगुले, बाळा शिंदे, आतिष पवार, विलास कोरे, देविदास गवंडी, संजय राठोड, दयानंद रोडगे, दयानंद बमनळ्ळी, राजकुमार झिंगाडे, कांतु धनशेट्टी, राहुल वाडे, शिवशंकर स्वामी यांच्यासह शेकडो भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.



## सोलापूर जिल्ह्यात साकारत आहेत पर्यावरण दीपगृह शाळा

**सोलापूर** : जागतिक तापमान वाढ हवामान बदल आणि आनंददायी पर्यावरण शिक्षण या उपक्रमाच्या अंतर्गत युनिसेफ,पर्यावरण शिक्षण केंद्र पुणे, एस सी आर टी पुणे,आणि युगंधर फाउंडेशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर जिल्ह्यातील १२०० शिक्षकांना हवामान बदल व आनंददायी पर्यावरण शिक्षण याचे प्रशिक्षण देण्यात आले. याच उपक्रमाच्या अंतर्गत जिल्ह्यातील १० जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा दीपगृह शाळा म्हणून निवडण्यात आल्या असून या शाळा पर्यावरण उपक्रम आणि हवामान बदल, पर्यावरण संरक्षण - संवर्धनासाठी विद्यार्थ्यांच्या वर्तनात बदल घडविण्यासाठी विविध उपक्रमांच्या द्वारे प्रयत्न करतील.प्राथमिक स्तरावर जिल्ह्यातील १० शाळांची निवड या उपक्रमासाठी करण्यात आली आहे.वाढते तापमान आणि हवामान बदल याचा मोठा फकटा बालक आणि स्त्रियांच्या रोजच्या जीवनावर होत असतो याचा विचार करून युनिसेफ आणि इतर संस्थांच्या मदतीने हा उपक्रम महाराष्ट्रात ९जिल्ह्यात राबविला जात आहे .भविष्यात या दिपगृह शाळा या पर्यावरण उपक्रमांच्या साठी पथदर्शी ठरतील आणि इतर शाळांच्या साठी देखील प्रेरणास्थान ठरतील असा विश्वास युगंधर फाउंडेशन च्या अध्यक्षा प्रा रेश्मा माने यांनी व्यक्त केल्या.यासाठी संस्थेच्या वतीने जिल्हा समन्वयक म्हणून प्रज्ञा कुलकर्णी या काम पाहतात तर संतोष उकरडे,राहुल लोंढे,सुप्रिया माने,विजय कुचेकर यांनी समन्वयक म्हणून कार्य करीत आहेत.या उपक्रमासाठी जिल्ह्याचे प्राथमिक शिक्षण अधिकारी संजय जाविर सर, डायट चे प्राचार्य कोरडे सर, प्रा.क्रांती कुलकर्णी यांचे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

दीपगृह शाळा यादी : १ जिल्हा परिषद शाळा तेलगाव, २ जिल्हा परिषद शाळा येळेगावं, ३ जिल्हा परिषद शाळा होनमुर्गी, ४ जिल्हा परिषद शाळा बानेगावं, ५ जिल्हा परिषद शाळा नेहरू नगर, ६ जिल्हा परिषद शाळा सोरेगाव, ७ जिल्हा परिषद शाळा बोपले, ८ जिल्हा परिषद शाळा, तळे हीप्परगे, ९ जिल्हा परिषद शाळा कोंडी, १० जिल्हा परिषद शाळा औज आहेर वाडी.




## मुलींची छेडछाड काढणे, शेरेबाजी करण्यापासून अलिप्त रहा : सनगल्ले

**अक्कलकोट** : मुलींचे छेडछाड काढणे व त्यांना अश्लील भाषेत शेरेबाजी करणे या गोष्टीपासून सर्व मुलांनी सावध राहायला पाहिजे, कारण आता कायदे खूपच कडक झालेले आहेत.जर यामध्ये आपण अडकलात तर तुमचे आयुष्य बरबाद होईल. म्हणून आपण चांगले मित्र मैत्रिणी निवडा आणि टवाळखोर मुलांसोबत मैत्री करू नका असे प्रतिपादन वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल सनगल्ले यांनी केले. हालचिंचोळी येथील श्री मलकारसिद्ध हायस्कूलचे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम पार पडला.त्यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले बोलत होते.पुढे बोलताना सनगल्ले म्हणाले, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना येणाऱ्या संभाव्य अडचणी व उपाय या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांना आलेले शालेय व महाविद्यालयीन जीवनामधील फरक हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले.व मार्च मध्ये होणाऱ्या एस.एस. सी बोर्ड परीक्षासाठी व पुढील महाविद्यालयीन शिक्षणासाठी सर्व विद्यार्थ्यांना ते शुभेच्छा दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जैन गुरुकुल प्रशालेचे निवृत्त शिक्षक विश्वनाथ कल्याणशेट्टी होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे संस्थापक म्हाळप्पा सुरवसे, उपाध्यक्ष सुभाष नागरसे, खजिनदार इंदलबेग मिर्झा, मुख्याध्यापक व्यंकटेश बोकडे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आकांक्षा जगताप तर आभार प्रदर्शन प्रिती बन्ने यांनी केले.

## बार्शीनजीक टेम्पोच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**बार्शी** : दुचाकीमध्ये पेट्रोल टाकून पती येईपर्यंत रस्त्याच्या कडेने चालत निघालेल्या महिलेस टेम्पोने पाठीमागून जोराची धडक दिल्याने एक महिला ठार झाली. बार्शी-गाडेगांव रस्त्यावर बायपास चौकानजीक दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास सदरची घडना घडली.

रूपाली धनंजय गायकवाड (वय ३७ रा. उपळाई रोड, शेंडगे प्लॉट, बार्शी) असे यातील मयत महिलेचे नाव आहे. महिलेचे पती धनंजय गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जोराची धडक देवून महिलेच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी टेम्पोचालकावर बार्शी तालुका पोलीसांत गुन्हा दाखल झाला आहे. जयन्ना पूर्ण नांव माहित नाही. असे त्याचे नांव आहे.

धनंजय हे दुपारी ४.३० वा चे दरम्यान त्यांची दुचाकी एम एच १३ एए २४८४ हिचेवरून पत्नी रूपाली व मुलगा अथर्व वय १४ व मुलगा वेदांत वय ११ असे सर्वजण जवळा येथे नातेवाईकांकडे निघाले होते. गाडेगांव बायपास चौक येथे गेल्यानंतर दुचाकीमध्ये पेट्रोल कमी असल्याने पत्नी रूपाली व मुलगा अथर्व यांना गाडेगाव चौकात रोडच्या कडेला उभे करून धनंजय व मुलगा वेदांत असे दोघे नजीकच्या इसार पेट्रोलपंपावर पेट्रोल भरणेकरिता गेले. त्यावेळी मिनी टेम्पो (के ए ४४ ए १८४९) च्या चालकाने पत्नी रूपालीस पाठीमागून जोराची धडक दिलेली त्यांनी पाहिली. त्यांनी एका वाहनातून पत्नीस तातडीने उपचारार्थ बार्शी शहरात आणले. तेथे डॉक्टरांनी तपासणी करून मयत झाल्याचे सांगितले.



## जोपर्यंत जुनी पेन्शन लागू होत नाही तोपर्यंत संप सुरूच : काटकर

**सुराज्य/सोलापूर**

राज्य सहकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र राज्य हे संघटना कर्मचाऱ्यांचे प्रश्न घेऊन गेल्या अनेक वर्षांपासून लढत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही या पेन्शनधारकांच्या लढ्यात उतरलो आहोत. २००४ सालापासून सरकारच्या नवीन धोरणानुसार कर्मचाऱ्यांची पेन्शन अडून पडली आहे ती तातडीने पूर्ववत सुरू करावी ही पेन्शन योजना जोपर्यंत सुरू करणार नाहीत तोपर्यंत राज्य कर्मचारी संघटनेचे हे आंदोलन असेच पुढे चालू राहणार असल्याची माहिती संघटनेचे राज्य सरचिटणीस विश्वास काटकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना हे महाराष्ट्रभर काम करत असून गेल्या अनेक वर्षापासून या संघटनेच्या वतीने कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचे काम केले आहे आणि कर्मचाऱ्यांचे प्रश्न संघटने मार्फत सोडविले आहेत कर्मचारी संघटनेचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जुनी पेन्शन योजना २००४ सालापासून बंद करण्यात आले असून ती पूर्ववत सुरू करावी या मागणीसाठी गेले अनेक दिवसापासून संघटनेचे हे आंदोलन सुरू आहे. मात्र राज्य सरकारने ना केंद्र सरकारने याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांचे कुटुंब ही पेन्शन न मिळाल्यामुळे रस्त्यावर येण्याची वेळ आली आहे. संघटनेच्या वतीने दि. १४ मार्च पासून त्या त्या जिल्ह्यात कर्मचारी संघटनेच्या वतीने बेमुदत संप करणार आहोत.

आजपर्यंत कुठल्याही कर्मचारी संघटनेच्या कर्मचाऱ्यांना पेन्शन सुरू केलेली नाही किंवा दिलेली नाही डीसीपीएस ही नवीन औश दान पेन्शन योजना आहे. या योजनेच्या अंतर्गत जे कर्मचारी पेन्शन पासून वंचित आहेत. अशा सर्व कर्मचाऱ्यांना ही पेन्शन तातडीने लागू करण्यात यावी म्हणून आमचे आंदोलन सुरू असून राज्याबरोबर इतरही ठिकाणी काही राज्यात हे आंदोलन सुरू राहणार आहे. अशा प्रकारची पेन्शन योजना महाराष्ट्र राज्याबरोबर इतर पाच राज्यात राज्य सरकारने केव्हाच लागू केलेली आहे .असे असताना महाराष्ट्र राज्य आमच्या हक्काचे पेन्शन आम्हाला देऊ शकत नाही आमचे संघटना ही जात धर्मपंथन असे भेदभाव किंवा राजकारण करणारी नाही. त्यामुळे या संघटनेत राजकारण हा विषय नसून केवळ आणि केवळ कर्मचाऱ्यांच्या भल्यासाठी लढतो आमच्या लढा हा जुनी पेन्शन. देण्याबाबत आहे.या योजनेचा तातडीने लाभ देण्यात यावा अन्यथा आमचे हे सुरू झालेले आंदोलन पुढे कायमच ठेवू असा इशारा संघटनेच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेत हा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला.



## बार्शीत राज विजय क्रीडा मंडळाची शिवजयंतीनिमित्त शिवरायांची मिरवणूक

**सुराज्य/बार्शी**

येथील राज-विजय क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने बार्शीत शिवजयंतीनिमीत्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनारूढ मूर्तीची शहरातून भव्यशाही मिरवणूक काढण्यात आली. जय भवानी ..जय शिवाजी... हर हर महादेवच्या जयघोषात सहभागी संघांनी जल्लोषात सादरीकरण केले. हत्तीवर अंबारीत छत्रपती शिवरायांच्या वेशभूषेत युवक तर ८ शुभ्र अश्वांवर विराजमान मावळ्यांनी तसेच ट्रॅक्टर ट्रॉलीवर शिवरायांच्या जीवनातील ऐतिहासिक प्रसंगाचे हलते देखावे,पारंपारिक वादयांसह ३ गज ढोल पथके, लेझीम संघ व राज्याच्या विविध शहरातील नामांकित बँड पथकांनी बार्शीकरांचे लक्ष वेधले.

शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी. वाय.यादव यांच्या हस्तेमिरवणूकीचे उदघाटन झाले. यावेळी आमदार राजेंद्र राऊत, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, असिफ तांबोळी, जयकुमार शितोळे, डॉ.प्रकाश बुरगुटे, राज विजय क्रीडा मंडळाचे अध्यक्ष विजय राऊत, बाजार समितीचे सभापती रणवीर राऊत, युवा नेते अभिजीत राऊत, सचिन मडके यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, विविध गांवचे सरपंच, उपसरपंच आदी उपस्थित होते. यंदाच्या मिरवणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पुष्पहारांनी सजवलेल्या तीन ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये शिवरायांच्या जीवनातील महत्वाच्या ऐतिहासिक प्रसंगाचे तीन हलते देखावे सादर करण्यात आले. यामध्ये छत्रपती शिवरायांनी स्वराज्याची रायरेश्वरी घेतलेली शपथ, भवानी माता तलवार देखावा व राज्याभिषेक नंतर हत्तीवरून काढलेली मिरवणूक अशा प्रत्येक देखाव्यात ६ ते ८ मूर्तीचा हलता देखावा होता. शेवटी छत्रपती शिवरायांनी सिंहासनारूढ मूर्ती होती. अशा थाटामाटात मिरवणूक झाली. आ. राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील प्रमुख मार्गावरून हीमिरवणूकनेण्यात आली.

## पिंपरी येथे दिवसा ७० हजारांचे दागिने पळविले

**सुराज्य/सोलापूर**

चौभे पिंपरी (ता.माढा) येथे राहणाऱ्या दिनेश महादेव जळकुटे यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील २० ग्रॅम सोन्याचे दागिने पळविले. ही चोरी शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. टेंभुर्णी पोलिसात याची नोंद झाली असून सहाय्यक फौजदार सरडे पुढील तपास करीत आहेत.

**दुचाकी अपघात; जखमी महिलेचा मृत्यू**

कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून गंभीर जखमी झालेल्या छायाबाई बाबु उपाडे (वय ५२ रा.जगजीवनराम झोपडपट्टी,मोदी) या शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी रात्री मयत झाल्या.१४ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सुमारास त्या दुचाकीवरून घरातून निघाल्या होत्या. कुत्रा आडवा आल्याने त्या जखमी झाल्या होत्या. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सदर बाजार पोलिसात याची नोंद झाली आहे .

**मारहाण करून महिलेचे कान कापले; कुंभारी घरकुल येथील घटना**

घरगुती भांडणातून मारहाण करीत तिक्ष्ण शस्त्राने पत्नीचे कान कापल्याची घटना नवीन घरकुल कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. अरिफा इमरान ढालायत (वय ३४) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमी ही घटस्फोटीत असून सध्या ती माहेरी राहण्यास आहे. तिचा दुसरा पती अकील शकील सय्यद (रा.शास्त्रीनगर) आणि त्याच्या साथीदारांनी हा प्रकार केला.अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## रस्त्यावरची लढाई संपू देऊ नका : डांगळे
### दलित पँथरच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त सोलापुरात जागर क्रांतीचा

**सुराज्य/सोलापूर**

सद्यस्थितीत विचार स्वातंत्र्यावर घाला घातला जात आहे. लोकशाही धोक्यात आली आहे. प्रगतीचे पंख छाटले जात आहेत. समाजात अंधश्रध्दा पसरवली जात आहे आणि त्यातून नव्याने गुलामी लादण्याचा प्रयत्न होत आहे.

नवा भारत घडविण्यासाठी संविधान जपलं पाहिजे असे सांगतानाच विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मानव मुक्तीच्या लढ्याचे प्रणेते होते. त्यांचेच समतावादी, सर्व कल्याणाचे विचार घेऊन दलित पँथर या क्रांतिकारी संघटनेने लढा सुरू ठेवला. दलित पँथर चळवळ ही एक जाणीव होती. अन्यायाविरुद्ध हक्क व स्वाभिमानासाठीचा धगधगता अंगार होता. तेव्हा रस्त्यावरची लढाई संपू देऊ नका, असे आवाहन दलित पँथरचे सहसंस्थापक अर्जुन डांगळे यांनी केले.

दलित पँथर या संघटनेच्या सुवर्ण महोत्सवा निमित्त सोलापुरात हुतात्मा स्मृती मंदिरात दि. २५ व २६ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ११ ते रात्री ९




वाजेपर्यंत आयोजित जागर क्रांतीचा - उत्सव विचारांचा हे दोन दिवसीय प्रबोधनात्मक संमेलनाचे थाटात प्रारंभ झाला करण्यात आले. याप्रसंगी उद्घाटन सत्रात दलित पँथरचे सहसंस्थापक अर्जुन डांगळे (मुंबई) हे बोलत होते. यावेळी विचार मंचावर प्रा. डॉ. लक्ष्मण यादव (नवी दिल्ली), प्रा. राजेंद्र कोणारकर, ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड प्रा. डॉ. एम.आर. कांबळे, दलित पँथरचे पहिले जिल्हाध्यक्ष बसवराज कपाळे, आत्मबलिदान केलेले पँथर नारायण गायकवाड यांच्या पत्नी मंदोदरी गायकवाड, विद्रोही कवी बाबुराव बागुल यांचे नातू मनोज बागुल आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

जातीयवाद्यांना राजकीय सत्तेपासून रोखले पाहिजे. चळवळ ही कोणाची मक्तेदारी नाही. ही आज काळाची गरज आहे. अहंकार सोडला पाहिजे. आपापसातील मतभेद विसरले पाहिजे आणि रस्त्यावरची लढाई संपवू देऊ नका असे आवाहनही यावेळी अर्जुन डांगळे यांनी केले.

याप्रसंगी प्रा. कांबळे, दत्ता गायकवाड, कपाळे यांच्यासह मान्यवरांची भाषणे झाली. प्रारंभी विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रस्ताविक निमंत्रक अतिश बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अंजना गायकवाड यांनी केले तर आभार संयोजन समितीचे अनुराग सुतकर यांनी मानले. यावेळी संयोजन समितीचे सत्यजित वाघमोडे, सुकांत वाघमारे, पृथ्वीराज मोरे, चंद्रकांत सुरवसे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

CMYK




## दमाणी परिवाराकडून दहावीच्या कर्णबधीर विद्यार्थ्यांना निरोप

**सुराज्य/सोलापूर** : उज्वल भविष्यासाठी आणि यशस्वी वाटचालीसाठी रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी दमाणी परिवार आणि शाळेकडून शुभेच्छा आणि शुभाशीर्वाद देण्यात आले. संस्थेचे विश्वस्त राजेश दमाणी प्रिया दमाणी आणि त्यांचा मित्रपरिवार याप्रसंगी उपस्थित होता. दहावीच्या आजपर्यंतच्या शंभर टक्के निकालाची परंपरा अबाधित ठेवावी, अशी भावना याप्रसंगी त्यांनी व्यक्त केली.

प्रारंभी रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचे अध्यक्ष डॉ. निहार बुरटे यांनी राजेशजी दमाणी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. प्रिया दमाणी यांचा सत्कार धनश्री केळकर यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या अतिथींचा सत्कार शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी केला. उपस्थितांचे स्वागत आणि प्रास्ताविक मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले. तसेच दमाणी परिवाराकडून शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

या कार्यक्रमास अध्यक्ष डॉ. निहार बुरटे, शाळेचे सचिव सुनील दावडा, धनश्री केळकर, देविदास मेढे, संजय चौगुले, पसपुले, चंदनशिवे, पिटाळकर, पारेकर, चिंचोळे, सातपुते, बागवान, बेनुरे, ठाकर, बसाटे, ताठे, मदभावी, पाटील, थोरात, पवार आणि पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित पाटील यांनी केले तर आभार सचिव सुनील दावडा यांनी मानले.

## चारचाकी गाडीतून दीड लाख किंमतीची गोवा दारू जप्त

**सुराज्य/सोलापूर** : राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने २५ फेब्रुवारी रोजी करमाळा तालुक्यातील नेर्ले गावाच्या हद्दीत एका रेनॉल्ट डस्टर गाडीतून १ लाख ५३ हजार ६०० किमतीचे गोवा राज्यातील दारू जप्त केली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या करमाळ्याच्या पथकाचे दुय्यम निरीक्षक शंकर पाटील यांना २५ फेब्रुवारी रोजी मिळालेल्या बातमीनुसार त्यांनी जवान विकास वडमिले यांच्यासह करमाळा तालुक्यातील नेर्ले गावाच्या हद्दीत पाळत ठेवली असता त्यांना एका रेनॉल्ट डस्टर क्र. एमएच.४८.पी.०३८८ या चारचाकी वाहनातून गोवा राज्य निर्मित व विक्रीस असलेले इम्पेरियल ब्ल्यू व्हिस्की १८० मिलीच्या ९६० बाटल्या वाहतूक होत असल्याचे आढळून आले. या गुन्ह्यात त्यांनी वाहन चालक निलेश लालासाहेब पडवळे (वय-३१, रा. उमरड, ता. करमाळा) याला ताब्यात घेऊन त्याचेविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. तसेच त्यास २६ फेब्रुवारी रोजी न्यायालयासमक्ष हजर केले असता प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी आरोपीस एका दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली आहे. या गुन्ह्यात १ लाख ५३ हजार ६०० रुपये किमतीच्या गोवा दारूसह एकूण पाच लाख तेहतीस हजार सहाशे किंमतीचा मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क विभागाने हस्तगत केला आहे. या कारवाईत निरीक्षक सदानंद मस्करे, सहायक दुय्यम निरीक्षक गजानन होळकर, महावीर कोळेकर, जवान अनिल पांढरे यांनी सहकार्य केले. या कारवाईत रुपये ६५ हजार पाचशे पन्नास किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सीमा तपासणी नाका नांदणीच्या पथकाने २५ फेब्रुवारी रोजी अक्कलकोट तालुक्यातील तडवळ परिसरात दोन मोटरसायकलींसह २०० लिटर ताडी जप्त केली असून, आबादास चिंचोळ या इसमास अटक केली असून, एक आरोपी फरार आहे, त्याचा शोध सुरू आहे. ही कारवाई निरीक्षक गुलाब जाधव, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, जवान योगिराज तोग्गी, वसंत राठोड यांनी पार पाडली.

## मागील भांडणावरून तरुणाच्या डोक्यात घातली फरशी

**सुराज्य/सोलापूर** : मागील भांडणाचा राग मनात धरून तरुणाच्या डोक्यात फरशी घालून गंभीरित्या जखमी केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. २२ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास गणी यांच्या किराणा दुकानासमोर घडली. याप्रकरणी विशाल प्रकाश राठोड (वय-१९, रा. कमला नगर, विजापूर रोड) याने विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून बाळा शिवशरण व अभिषेक कापुरे (रा. कमला नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. विशाल राठोड हा गणी किराणा दुकानासमोर बसला असताना, बाळा शिवशरण याने मागील भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ केली. त्यानंतर अभिषेक कापुरे याने जमिनीवर पडलेली फरशी उचलून विशाल याच्या डोक्यात मारून गंभीररित्या जखमी केले. विशाल हा जमिनीवर पडल्यानंतर बाळा शिवशरण व अभिषेक कापुरे यांनी विशाल राठोड याला काठीने मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.

# रणजितसिंह शिंदे माढ्याचे भावी आमदार : पाटील

## उपळाई खुर्द येथे आ. बबनराव शिंदे यांची पेढेतुला तर रणजितसिंह शिंदेंची ग्रंथतुला

**सुराज्य/माढा**




मंत्रिपद नाकारून तालुक्याच्या शेतकऱ्यांसाठी देशातील एक नंबरचा भिमा सीना जोडकालवा मंजूर करून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवत राज्यात सर्वाधिक ऊस उत्पादन आणि ऊस गाळपात तालुका नंबर एक बनवणारे आमदार बबनराव शिंदे हे पाणीदार आमदार आहेत. ज्याप्रमाणे गेली सहा टर्म आपण त्यांना प्रेम दिले त्याप्रमाणे यापुढे त्यांचे सुपुत्र रणजितसिंह शिंदे यांच्या पाठीशी खंबीरपणे राहण्याचे आवाहन मोहोळ तालुक्याचे माजी आमदार राजन पाटील यांनी केले. आपल्या भाषणात माजी आमदार पाटील यांच्या भाषणात त्यांनी माढा तालुका विधान सभेचे उमेदवार हे रणजितसिंह शिंदेच असणार असल्याचे सांगितल्याने जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे हे शिंदे परिवाराकडून विधानसभा लढणार असल्याचे जणू निश्चित झाल्याचे बोलले जात आहे. उपळाई खुर्द ता. माढा येथे सरपंच संदीप पाटील यांनी आयोजित केलेल्या विविध विकास कामाच्या भूमिपूजन व लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते.

आपल्या भाषणात राजन पाटील यांनी आमदार बबनराव शिंदे यांच्या पावलावर पाऊल ठेवत कार्य सुरू केले असून अडचणीत असलेल्या जिल्हा दुध संघाची अध्यक्षपदाची धुरा हाती घेतल्यापासून प्रतिदिन १७हजार लिटर दुधाचे संकलन ७० हजारवर नेत दूध संघाला ऊर्जितावस्था आणीत आहेत.

आमदार बबनदादासारखी दूरदृष्टी आणि सर्वसामान्यांच्या विकासासाठी असणारी तळमळ पाहता तालुक्यातील जनतेने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

आमदार बबनराव शिंदे यांनी भविष्यात माढा तालुक्यातील उर्वरित उपसा सिंचन योजनेचे काम पूर्ण करणार असून खैराव मानेगाव योजनेसह सर्व योजना कार्यान्वित झाल्यानंतर तालुक्यातील ९० टक्के क्षेत्र ओलिताखाली येणार असून तालुक्यातील शेतकर्यांच्या जीवनात संपन्नता आल्याशिवाय राहणार नसल्याचे सांगितले.

यावेळी आमदार बबनराव शिंदे यांची पेढेतुला तर रणजितसिंह शिंदे यांची ग्रंथतुला करण्यात आली. यावेळी संदीप पाटील यांच्यावतीने जिल्हा परिषद शाळेस दोन एलईडी आणि एक वॉटर फिल्टर भेट दिला. आ. शिंदे यांना देण्यात आलेल्या मानपत्राचे वाचन राजेंद्र गुंड यांनी केले.

यावेळी माढेश्वरी बँकेचे उपाध्यक्ष अशोक लुणावत, कृषी उत्पन्न बाजार समिती सुहास पाटील, बुद्रुक वाडीचे उपसरपंच निलेश भोसले, माढा पोलिस ठाण्याचे साहा. पो. नि. श्याम बुवा, विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक अमोल चव्हाण, शंभुराजे मोरे, शहाजी चवरे,भागवत चौगुले, सचिन चवरे, संतोष लोंढे, अमोल चवरे, भाऊसाहेब पाटील, वैभव पाटील, शंभू पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक ॲड. सुरेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव चव्हाण यांनी केले.

मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांना भाजप प्रवेशाबाबत विचारले असता बबनदादा जो निर्णय घेतील तोच आपण घेणार असल्याचे सांगत पक्ष प्रवेशाचा चेंडू आ. शिंदे यांच्या कोर्टात टोलविला.

### आ. शिंदे यांचा श्रेयवाद्यांना टोला

विद्यमान सरकारने माढा तालुक्यातील १७ कोटी रूपयांच्या विकास कामांना दिलेली स्थगिती व टेंभुर्णीत मंजूर असलेल्या उपजिल्हा रूग्णालयाच्या उभारणीमध्ये निर्माण करण्यात आलेला राजकीय अडथळा दूर करण्याचे काम श्रेयवाद्यांनी करून तालुक्यातील जनतेला न्याय मिळवून द्यावा.



## शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणाऱ्या अत्यल्प मावेजाच्या नोटिसांची सामुदायिक होळी

**सुराज्य/अक्कलकोट**

सुरत-चेन्नई महामार्गासाठी शेतकऱ्यांना उध्वस्त करणाऱ्या अत्यल्प मावेजाच्या नोटिसांची सामुदायिक होळी करण्यात आली. अध्यक्षस्थानी भाजपाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब मोरे हे होते.

ग्रीन कॉरिडोर राष्ट्रीय महामार्गासाठी दिला जाणाऱ्या मावेजाची रक्कम एकरी पाच लाख आणि बागायत जमिनीसाठी सात लाख इतके अत्यल्प असल्याने शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील या महामार्गासाठी प्रशासनाने रोवलेल्या खुंटी उखडून टाकून या महामार्गासाठी एक इंचही जमीन देऊ नये असे आवाहन अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना भ्रमणध्वनीवरून खासदार राजू शेट्टी यांनी केली.या बैठकीचे आयोजक शेतकरी नेते स्वामीनाथ हरवाळकर यांनी समृद्धी मार्ग किंवा बाजारभावाच्या पाचपट दर जाहीर केल्याशिवाय शेतकऱ्यांनी शासनाच्या नोटिसा घेऊ नये व बलिदानास सज्ज राहावे असे आवाहन केले. भाजपाच्या महिला अध्यक्ष सुरेखा होळीकट्टी यांनी याबाबत लवकरच नितीन गडकरी यांची अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना घेऊन न्याय मागणार असल्याचे सांगितले.

शासनाच्या तुघलकी आदेशामुळे राज्यातला शेतकरी उध्वस्त होत आहे. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांचे थडगे उभे केले जात आहेत.या बैठकीत सर्व शेतकऱ्यांनी भूसंपादनाला तीव्र विरोध करून शासनाचा धिक्कार केला.

या बैठकीसाठी अक्कलकोट ग्रामीण व मैंदर्गी, नागनळी, मातनळी, कोनहल्ली, सिन्नर, हसापूर, चपळगाव, चपळगाव वाडी, बोरेगाव, कुरनुर, दहिटणे, दहीटणेवाडी डोंबर जवळगे, सिंदखेड आणि अक्कलकोट तालुक्यातील सुरत चेन्नई ग्रीन फील्ड एक्सप्रेस हायवे बाधित शेतकरी प्रचंड संख्येने उपस्थित होते.शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दाखवून शासनाच्या या निर्णयाचा तीव्र विरोध केला. पुढच्या आठवड्यापासून तालुक्यात उग्र आंदोलन छेडणार असल्याचे बाळासाहेब मोरे यांनी सांगितले.

या बैठकीस शेखर कुंभार,चेतन जाधव,सुभाष शिंदे,संजय जाधव,अमित काळे,अजय सुरवसे,वीरेश भंगरगी,जगदेवआप्पा कलमनी,मल्लिनाथ मैत्री, संजय सवळी,दीपक कदम, शंभुलिंग आकतनाळ, ज्ञानेश्वर पवार,नागनाथ सुलगडले आदि शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्याजाने पैसे देण्याचे आमिष दाखवून महिलेची फसवणूक

**सुराज्य/सोलापूर**

तीन टक्के व्याजाने रक्कम देतो असे सांगून सोलापुरातील एका महिलेची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी शकुंतला सिद्राम पोतदार (वय-६४, रा. श्रीनगर, विजापूर रोड) यांच्या नावावरील जमीन रजिस्टर खरेदी खताव्दारे खरेदी करून त्यांच्या चेकचा बनावट वापर करत त्याच्या खात्यातून पैसे काढत फसवणूक केली, अशा आशयाची फिर्याद पोतदार यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली. यांच्या फिर्यादीवरून शकलेश सिद्राम जाधव (रा. सेटलमेंट फ्री कॉलनी) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी शकुंतला पोतदार यांना संशयित आरोपी शकलेश जाधव याच्याकडून वीस लाख रुपये तीन टक्के दराने पैसे देतो असे सांगितले. त्यानुसार पाच लाख रुपये देत, त्याबदल्यात जुळे सोलापुरातील पोतदार यांच्या नावावर असलेली जागा रजिस्टर खरेदी करून घेतले. त्यानंतर खासगी बँकेचे दहा कोरे चेक सिक्युरिटी म्हणून घेतले. त्या बॅंक खात्यावर फिर्यादीच्या परस्पर रक्कम जमा करून ती रक्कम दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यावर जमा करून चेकचा गैरवापर करून बनावट सही करून २१ लाख रुपये ट्रान्सफर केले, तसेच ती रक्कम दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यावर फिर्यादीच्या परस्पर बँकेतून चेकव्दारे १५ लाख रूपये काढून घेतले. अशा प्रकारे व्याजाने पैसे देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक फौजदार मोरे हे करीत आहेत.

## सावरकर यांच्या पुतळ्यास मनपातर्फे अभिवादन

**सुराज्य/सोलापूर**

श्री मार्कंडेय उद्यान येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुतळ्यास महापालिकेच्या वतीने सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी विठ्ठल कस्तुरे, श्रीनिवास करली, रामचंद्र जन्नू, माजी विश्वनाथ बेंद्रे, रामभाऊ तडवळकर, आदी मान्यवर उपस्थित होते.



## लहान मुलांना मोबाईलपासून दूर ठेवा : डॉ. गुंजोटीकर

**एन के किड्स स्कूल चे स्नेहसंमेलन उत्साहात**

**सुराज्य/सोलापूर** : सोशल मीडियाच्या जगात लहान मुले देखील सोशल मीडियाच्या आहारी चालली आहेत त्याना सोशल मिडिया पासुन वाचविन्यसाठी लहान मुलाना मोबाईल पासुन दूर ठेवले पाहिजे असे आवाहन , स्त्रीरोग तज्ञ डॉ मीना गुंजोटिंकर यांनी उपस्थित पालकांना केले.

ते ओम फाउंडेशन संचालित एन् के किड्स स्कूल स्कूलच्या स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. या प्रसंगी मंचावर आर्यनंदी पतसंस्थेचे चेअरमन राजेश फडकुले, आहारतज्ञ डॉ ललिता पेठकर, युवा उद्योजक यश करजगी, प्रिन्सिपल श्वेता कस्तुरे, ट्रस्टी राजाभाऊ अलुरे, अंजली गुरव, आनंद भवर, शिरीष सुरवसे व संस्थेचे चेअरमन विकास कस्तुरे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी गणेश वंदनेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. दीपप्रज्वलना नंतर कांचन हुन्नुरे यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. पालक प्रतिनिधी राधिका कुलकर्णी यांनी त्यांची मुलगी रुच्या कुलकर्णी हिच्या वाढदिवसा च्या निम्मिताने स्कूल ला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते संगणक भेट दिला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका दिपाली कुलकर्णी अश्विनी शिंगण कोमल अदलिन्गे संगीता हेगडकर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कांचन हुनुरे यांनी केले.तर आभार दिपाली कुलकर्णी यांनी मानले.

## शेतकऱ्याची व्यथा मांडणारा 'रौंदळ' ३ मार्चला प्रेक्षकांच्या भेटीला

**सुराज्य/सोलापूर** : शेतकऱ्याची व्यथा मांडणारा हा रौंदळ चित्रपट असून,या चित्रपटातील रौंदळ नावाचा अर्थ म्हणजे तूडवून नाश करणे,नष्ट करणे होय.मी सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील आहे. प्रत्येक गोष्टीला न्याय देण्यासाठी विविध रूपामध्ये दिसतो.वास्तवात मी डान्सर नाही पण कलाकार असल्याने कॅमेरासमोर डान्स करावा लागतोय.कोणतीही व्यक्तीरिकेचे असेच आहे.कथेची गरज असल्याने मी डॅशिंग बनलो आहे,असे अभिनेते भाऊसाहेब शिंदे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.



तसेच नेहा सोनवणे म्हणाल्या की,मी एका शेतकरी कुटुंबातील मुलगी आहे.माझा हा पहिलाच चित्रपट असून,चित्रपटातील सर्वांनी मला सहकार्य केलं. यावेळी दिग्दर्शक गजानन पडोळ अभिनेता भाऊसाहेब शिंदे,अभिनेत्री नेहा सोनवणे हे या पत्रकार परिषदेत उपस्थित होते.'रौंदळ' हा चित्रपट अखेर रसिकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाला असून,३ मार्चला संपूर्ण महाराष्ट्रात हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.'रौंदळ'ची निर्मिती भूमिका फिल्म्स अॅण्ड एंटरटेनमेंट या संस्थेअंतर्गत बाळासाहेब शिंदे,डॉ. पुरुषोत्तम भापकर,प्रमोद चौधरी,भाऊ शिंदे आणि राईज बिझनेस ग्रुप यांनी केली आहे. रवींद्र औटी,संतोष औटी,कैलाश गुंजाळ आणि संजय कुंजीर या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत.

## निधन वृत्त

### पद्मिनी ताटे-देशमुख



**सुराज्य/अकलूज** : संगम (ता. माळशिरस) येथील पद्मिनी भिमराव ताटे-देशमुख यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८७ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, चार मुली, सुन, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी भिमराव ताटे-देशमुख यांच्या पत्नी व स. म. शंकरराव मोहिते-पाटील साखर कारखान्याचे माजी संचालक विठ्ठलराव माणिकराव ताटे-देशमुख यांच्या चुलती होत्या.

### डी. एन. मिसाळ



**सुराज्य/अकलूज** : सेवानिवृत्त नायब तहसीलदार दगडू नारायण मिसाळ (वय वर्षे ६२) रा. निमगाव (म.) ता. माळशिरस यांचे शनिवार दि २५ रोजी रात्रौ ९ वा अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. माळशिरस, इंदापूर येथे त्यांनी नायब तहसीलदारपदी काम केले होते.

# सर फाऊंडेशनचे 'सर सन्मान' पुरस्कार जाहीर

**सुराज्य/सोलापूर**



डी. राम रेड्डी, एम. डी., बालाजी अमाईन्स | शेखर गायकवाड (IAS), साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य | डॉ. कलीमोद्दीन शेख, संचालक, राज्य आंग्ल भाषा संस्था, औरंगाबाद. | डॉ. दिपक माळी, प्रशासन अधिकारी, MSCERT, पुणे. | डॉ. किरण धांडे, प्राध्यापक, यशदा, पुणे. | प्रदीप मोरे, माजी शिक्षण उपसंचालक, पुणे. | दत्तात्रय वारे, ख्यातनाम प्रयोगशील शिक्षक

**स्टेट इनोव्हेशन अॅन्ड रिसर्च फाऊंडेशन अर्थात सर फाऊंडेशन, महाराष्ट्र दरवर्षी राज्य व राष्ट्रीय स्तरावर शिक्षण क्षेत्राबरोबरच, ग्राम विकास, साहित्य लेखन, सामाजिक, संशोधन व ग्रासरूट इनोव्हेशन क्षेत्रातही विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उच्च पदावर कार्यरत व्यक्तींना, त्यांच्या कार्याला सलाम म्हणून प्रतिष्ठेचा 'सर सन्मान' हा राष्ट्रीयस्तर पुरस्कार देऊन सात व्यक्तींना सन्मानित करत असते. यावर्षी पुरस्काराचे हे पाचवे वर्ष आहे. या वर्षीचे 'सर सन्मान' पुरस्कार घोषित करण्यात आल्याची माहिती सर फाऊंडेशन राज्य समन्वयक सिद्धाराम माशाळे, बाळासाहेब वाघ आणि महिला राज्य समन्वयक हेमा शिंदे-वाघ यांनी दिली.**

सर सन्मानाने यांना केले जाणार सन्मानित - १) डी. राम रेड्डी (व्यवस्थापकीय संचालक बालाजी अमाईन्स लिमिटेड) २) शेखर गायकवाड (IAS) (साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे), ३) डॉ. कलीमोद्दीन शेख (संचालक, महाराष्ट्र राज्य आंग्ल भाषा संस्था, औरंगाबाद) ४) डॉ. दीपक माळी (प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे) ५) डॉ. किरण धांडे (प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी यशदा, पुणे) ६) प्रदीप मोरे (माजी शिक्षण उपसंचालक पुणे), ७) सर सन्मान गुरू वंदना दत्तात्रय वारे (ख्यातनाम प्रयोगशील शिक्षक, वाबळेवाडी आंतरराष्ट्रीय शाळेचे शिल्पकार पुणे)

पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, सन्मानचिन्ह व महावस्त्र असे आहे. विशेष म्हणजे या पुरस्कारासाठी कोणतेही अर्ज अथवा फाइल मागविली जात नाही. सर फौंडेशनच्या तज्ञ निवड समितीद्वारा या विजेत्यांची निवड करण्यात येते. पुरस्कार वितरण समारंभ दि. ४ मार्च रोजी सकाळी १० वा. सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव, सोलापूर येथे राष्ट्रीयस्तर कॉन्फरन्समध्ये होणार आहे.

पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व पद्मश्री पुरस्कार विजेते गिरीशजी प्रभुणे यांच्या हस्ते, कोलकत्ता येथील भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिल चेअरमन व जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू, मुंबई म्हाडा पुनर्विकासचे मुख्य कार्यकारी अधिकारी, ज्येष्ठ सनदी अधिकारी अरुण डोंगरे, सोलापूरचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, आयकर उपायुक्त स्वप्निल पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. देशभरातील प्रयोगशील शिक्षक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

यावेळी सर फाऊंडेशन आयटी विभागप्रमुख राजकिरण चव्हाण, जिल्हा समन्वयक अनघा जहागीरदार, नवनाथ शिंदे, गुणवंत चव्हाण, विजयकुमार वसंतपुरे, मोतीलाल जाधव, मारुती जावीर, डॉ. सतीश सातपुते, शोभा माने, राजन गरुड, आनंद आनेमवाड, शिल्पा वनमाळी आदी उपस्थित होते.

# नीरा देवधरसाठी चार हजार कोटी मंजूर, ६० हजार हेक्टर क्षेत्राला मिळणार लाभ : खा. निंबाळकर



## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुसंडी पोस्टरचे अनावरण

**सोलापूर** : यूपीएससी आणि एमपीएससीच्या परीक्षांमध्ये यश मिळवणं सोपं नाही,पण वाटतं तितकं कठीणही नाही.निश्चित ध्येय,एकाग्रपणे आणि चिकाटीने अभ्यास करण्याची वृत्ती यामुळे या परीक्षांत यश नक्कीच मिळू शकतं हे सांगणाऱ्या मुसंडी' या चित्रपटाचे पोस्टर अनावरण नुकतेच मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.सोनाई फिल्म क्रिएशन प्रस्तुत,गोवर्धन दोलताडे लिखित, निर्मित आणि शिवाजी दोलताडे दिग्दर्शित 'मुसंडी' हा मराठी चित्रपट २६ मे ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.यावेळी मंत्री संदीपान भुमरे,मंत्री उदय सामंत, मंत्री शंभूराज देसाई,मंत्री संजय राठोड,मंत्री गुलाबराव पाटील, रामदास कदम,अर्जुन खोतकर,खासदार हेमंत गोडसे,शिवाजीराव आढळराव पाटील,आ. सुहास कांदे,आ.संजय शिरसाट,आ.शहाजीबाप्पू पाटील,आ. ज्ञानराज चौगुले,आ.शांताराम मोरे,आ.बालाजी कल्याणकर व चित्रपट निर्माते गोवर्धन दोलताडे यांच्यासह मंत्रीमंडळातील अनेक सहकारी उपस्थित होते.



## निरंकारी मिशनकडून नदीपात्राची स्वच्छता

**अकलूज** : संत निरंकारी मिशनच्या वतीने सदगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या संकेल्पनेतुन स्वातत्र्यांच्या अमृत मोहत्सवी निमित्ताने अमृत जल अभियाना अंतर्गत संत निरंकारी मंडळ शाखा अकलुज यांच्या वतीने शिवसृष्टी कल्ला परीसरातील नदीपात्रात स्वच्छता करण्यात आली. सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचे जन्मदिनाच्या निमित्ताने व स्वातत्र्यांच्या अमृत मोहत्सवी निमित्ताने निरंकारी मिशनच्या माध्यमातून देशभर अमृत जल अभियाना अंतर्गत सार्वजनिक पाणवठ्याच्या ठिकाणी स्वच्छता अभियान राबवण्यात आले होते. दि.२६ फेब्रुवारीला दिल्ली येथे सदगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या उपस्थितीत अभियानास प्रारंभ झाला.तर यादिवशी एकाच वेळी देशभरातील २७ राज्यात ७०० शहरात ११०० ठिकाणी हे अभियान राबवण्यात आले होते.पाणवठ्याच्या परीसरातील स्वच्छता करुन पाणी स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न व पाणवठ्याचे परीसर स्वच्छ करुन पाणी स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनमध्ये जनजागृती करणे या उद्देशाने स्वच्छ जल, स्वच्छ मन हा नारा देत अमृत जल अभियाना राबवण्यात आले. अकलुज येथिल शिवसृष्टी कल्ला परीसरातील निरा नदीच्या पात्रातील गवत,प्लास्टिक, झुडपे इत्यादी कचरा उचलून स्वच्छता करण्यात आली.यावेळी अकलुज व पिलीव शाखेचे बहुसंख्य निरंकारी अनुयांयी व सेवादल यांनी सहभाग घेतला होता.

## गायकवाड वाडी येथील शाळेला वॉटर फिल्टर भेट

**मोडनिंब** : अविष्यत् ट्रस्ट ठाणे यांच्या कडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गायकवाड वाडी येथील शाळेला वॉटर फिल्टर भेट देण्यात आला. अविष्यत् ट्रस्ट यांच्या तर्फे भागवत पाटील यांनी शाळेकडे सोपवला. तसेच ग्रामपंचायत अरण तर्फे पाण्याची टाकी देण्यात आली. यावेळी भागवत पाटील यांनी अविष्यत ट्रस्ट चे सामाजिक कार्याची ओळख करून दिली तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी शुद्ध पाण्याची आवश्यकता असल्याने च वॉटर फिल्टर देण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयावर प्रभुत्व संपादन करावे असे मत मांडले. यावेळी नवनाथ शिंदे सर, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष शरद सावंत, उपाध्यक्षा भाग्यश्री गायकवाड, सर्जेराव गायकवाड, आप्पा गायकवाड, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य धनाजी सावंत, आश्विनी कदम, लतिका गायकवाड मुख्याध्यापिका सुनिता राडकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत चवरे यांनी तर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ सावंत यांनी आभार मानले.

## कुसुम सोलार कृषी पंप योजना चालू करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**पिलीव** : शासनाने शेतकऱ्यांनसाठी प्रधानमंत्री कुसुम सोलार कृषी पंप योजना सुरु केली आहे. पण याचा लाभ शेतकऱ्यांना होत नाही शेतकरी या योजनेसाठी ज्यावेळी आनलाईन फार्म भरण्यासाठी जातो त्यावेळेस तुमच्या गावाचा या योजनेत समावेश नाही त्यामुळे फार्म भरता येत नाही किंवा वेबसाईट ओपन होत नाही अशया प्रकारची उत्तरे ऐकवयास मिळतात यामुळे अनेक शेतकरी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ईच्छुक आहेत पण गावाचा समावेश नसल्यामुळे या योजनेचा लाभच शेतकऱ्यांना घेता येत नाही योजना चांगली आहे पण आमच्या काय कामाची आहे अशी शेतकऱ्यांनची भावना आहे. खरेतर संबंधित अधिकाऱ्यांनी याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे व ज्या शेतकऱ्यांना हया योजनेचा लाभ घ्यावयाचे आहे त्या सर्व शेतकऱ्यांना ही योजना देणे आवश्यक आहे.

सुराज्य सोलापूर Classified

विवाह विषयक

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : 9763624364, 7410553871 (040323)

**सुराज्य/सांगोला**

पुणे, सातारा, सोलापूर जिल्ह्यांतील पिण्याबरोबर शेतीसाठी फायदेशीर ठरणाऱ्या नीरा देवघर धरणाच्या ९३ किलोमीटर लांबीचा बंदिस्त पद्धतीने (हायब्रीड पद्धतीचा) उजवा कालवा साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कालव्यासह तीन उपसा सिंचन योजनांच्या कामांसाठी ३ हजार ९७६ कोटी रुपयांच्या तिसऱ्या सुधारित प्रशासकीय प्रस्तावाला मंत्रीमंडळाने मान्यता दिली. त्यामुळें सुमारे ६० हजार हेक्टर क्षेत्रास लाभ होणार आहे. नीरा देवघर धरणाचा उजव्या कालव्याचे ६५ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. त्यानंतर सुमारे १५८ किलोमीटरपर्यंत काम पूर्ण करण्याचे जलसंपदा विभागाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे ९३ किलोमीटर लांबीचा उर्वरित कालवा हायब्रीड पद्धतीने अर्थात पाइपलाइन पद्धतीने विकसित केला जाणार असल्याची माहिती खा. रणजितसिंह निंबाळकर यांनी दिली.

कृष्णा भीमा स्थिरीकरण, सांगोला उपसा सिंचन योजना, नीरा देवघर, जींहे कठापूर या सिंचन योजना पूर्णत्वास आणण्यासाठी खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांचा पाठपुरावा सुरू आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर खासदार झाल्यानंतर नीरा उजवा कालव्याचे बारामतीला पळवलेले पाणी खा.रणजितसिंह निंबाळकर यांनी आणून ते फलटण, पंढरपूर, माण, माळशिरस आणि सांगोल्याला दिले. त्यानंतर पाणी पळवल्यावरून खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी थेट बारामतीकरांनाच आव्हान दिले होते. त्यानंतर खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नीरा देवधर, कृष्णा भीमा स्थिरीकरण, सांगोला उपसा सिंचन योजना, जींहे कठापूर या सिंचन योजना पूर्णत्वास आणण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. दरम्यान ठाकरे सरकार सत्तेत आल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी पुन्हा निरा योजनेचे पाणी बारामतीला वळवले. त्यानंतर सत्तांतर होताच खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून नीरा देवधर, कृष्णा भीमा स्थिरीकरण योजनेसह इतर सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश आले असून जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या २०२२-२३ च्या दरसूचीच्या आधारे तीन हजार ९७६ कोटी ८३ लाख रुपये किमतीच्या सुधारित प्रस्तावाला मंत्रीमंडळाने मान्यता दिली. या प्रकल्पामुळे भोर तालुक्यातील ६



हजार ६७० हेक्टर, सातारा जिल्हातील अवर्षण प्रवण खंडाळा तालुक्यातील ११ हजार ८६० हेक्टर व फलटण तालुक्यातील १३ हजार ५५० हेक्टर तसेच सोलापूर जिल्हातील माळशिरस तालुक्यातील १० हजार ९७० हेक्टर असे तसेच अन्य असे एकूण ४३ हजार ५० हेक्टर क्षेत्रास प्रवाही व उपसा पद्धतीने सिंचन सुविधा उपलब्ध होणार आहे.

कॅबिनेट बैठकीत माढा लोकसभा मतदारसंघातील पाण्याच्या प्रश्नांसह इतर प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील, आमदार जयकुमार गोरे, आमदार राहुल कुल, भाजपचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, यांच्यासह प्रशासकिय अधिकारी उपस्थित होते. तसेच महत्वकांक्षी कृष्णा भीमा स्थिरीकरण प्रकल्पाचा प्रस्ताव पुन्हा केंद्र सरकारकडे पाठवून आवश्यक तो निधी राज्य सरकार उपलब्ध करून देईल असा सकारात्मक निर्णय घेण्यात आला. उरमोडी प्रकल्पाच्या बंदिस्त पाईपलाईनच्या कामास तत्वतः मान्यता देण्यात आली. दोन टीएमसीच्या सांगोला उपसा सिंचन योजनेला तत्वतः मान्यता देण्यात आली असून एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात प्रशासकिय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात असल्याची माहिती खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी दिली.

## शंकरराव चव्हाण यांच्या पुतळ्यास महापालिकेच्या वतीने अभिवादन

**सोलापूर** : सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. शंकरराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त डफरीन चौक येथील महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.शंकरराव चव्हाण यांच्या पुतळ्यास महापालिकेचे सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी विठ्ठल कस्तुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी गडकरींकडे विषय मांडणार : आ. कल्याणशेट्टी

**सुराज्य/अक्कलकोट**

बहुचर्चित चेन्नई-सूरत ग्रीनफिल्ड हायवेच्या निर्मितीसाठी अक्कलकोट तालुक्यातील अनेक शेत शिवारातून हा मार्ग जाणार आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेती बाधित होणार असून यासाठी शासनाकडून भूसंपादनात शेतकऱ्यांना अत्यल्प मोबदला जाहीर करण्यात आला. साधारणत: जिरायतसाठी एकरी ४ ते ५ लाख रुपये तर बागायतसाठी ५ ते ७ लाखापर्यंत नुकसान भरपाई जाहीर करण्यात आली आहे. अत्यल्प मोबदला मिळणार असल्याने चपळगाव, चपळगाववाडी भागातील शेतकऱ्यांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे तक्रारी मांडल्या.

दरम्यान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणार असून याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याडेही विषय मांडणार असल्याचे आमदार कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

ग्रीनफिल्डच्या भूसंपादन प्रक्रियेत बाधित शेतकऱ्यांना मागील आठवड्यापासून नुकसान भरपाई संदर्भातील नोटीसा जारी करण्यात येत आहेत. यामध्ये बाधित शेतीसाठी अत्यल्प मोबदला जाहीर करण्यात आला असून याविषयी शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे. बाधित शेतीमुळे शेतकऱ्यांच्या आयुष्यावर मोठा विपरित परिणाम होणार असल्याने सदरची रक्कम पुरेशी नसल्याची शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

चपळगाव येथे आयोजित कार्यक्रमासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी आले असता चपळगाव भागातील डोंबरजवळगे, तीर्थ, चपळगाववाडी, दहिटणेवाडी, कोन्हाळी आदी बाधित गावातील शेतकऱ्यांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे तक्रारींचा पाढा वाचला. ही बाब अन्यायकारक असून याविषयी



सहकार्य करण्याचे आवाहन शेतकऱ्यांनी यावेळी केले.

यापूर्वीच्या काळात प्रत्येक शेतकऱ्यांना गुंठेनिहाय रक्कम मिळाली आहे. मात्र चेन्नई-सूरत ग्रीनफिल्ड हायवेच्या निर्मितीसाठी भूसंपादनात शेतकऱ्यांना परती एकर अत्यल्प रक्कम मिळत असल्यामुळे तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

बाधित शेतकरी राजकुमार सुलगडले यांनी बोलताना म्हणाले, ग्रीनफिल्डच्या निर्मितीसाठी दोन एकर शेत बाधित झाले आहे. बाधित क्षेत्रासाठी ९ लाख रुपयांची नोटीस आली आहे. तीन वर्षात माझ्या शेतात ९ लाख रुपयांचे उत्पन्न घेतो. शेती गेल्यानंतर माझ्या कुटूंबाला मी कसे पोसणार याची भीती मला वाटत आहे. शंभर वर्षाच्या आयुष्याचा विचार करुन शासनाने मोबदला द्यावा, तेंव्हाच शेतकऱ्यांना न्याय मिळणार असल्याचे सांगितले.



## गावातील सर्व प्रकारचे अवैध धंदे बंद करा

### गावातील रणरागिण्यांची पोलीस ठाण्यावर धडक

**सुराज्य/सांगोला**

सांगोला तालुक्यातील वाणीचिंचाळे गावात गेल्या अनेक वर्षांपासून खुलेआम अवैध धंदे सुरू आहेत. ज्यामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त होऊन काही महिलांना वैधव्य प्राप्त झाले आहे. वारंवार मागणी करुनही दारूबंदी होत नसल्याने आज संतप्त झालेल्या गावातील महिला रणरागिणी होऊन पोलीस ठाण्यावर धडक दिली. गावातील सर्व प्रकारचे अवैध धंदे बंद करा असे निवेदन सांगोला पोलिसांना दिले आहे .या अवैध धंद्यांच्या विरोधात कारवाई व्हावी म्हणून गावातील महिला पोलीस ठाण्यात आल्या. आमच्या येथील दारूविक्री बंद करा' अशी मागणी करीत संतप्त महिलांनी जोरदार घोषणाबाजी केली.

गावात मागील १२ वर्षांपासून अवैध दारू विक्रिबंदी कागदपत्रे आहे. तत्कालीन महिला , ग्रामस्थ, ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी पोलिस प्रशासनाला वारंवार निवेदने दिली मात्र पोलीस प्रशासनाने फक्त कागदपत्रे दारूबंदी केली .विशेषतः काही काळासाठी दारू विक्रीवर प्रतिबंध ठेवत असत. यानंतर पुन्हा ही अवैध दारू विक्री सातत्याने सुरू करतात. त्यामुळे जेव्हा पैसे नसतात तेव्हा व्यसनी व्यक्ती आपल्या मुलाबाळांना, पत्नीला व आई-वडिलांना मारहाण करून घरातील धान्ये व भांडी विकून आपली व्यसनपूर्ती करतात. आजची नवीन पिढी अवघ्या १२ ते २० वर्षे वयोगटातील युवक व्यसनाच्या आहारी जात आहेत.विशेषतः ही अवैध दारू विक्री किती वेळा बंद व किती वेळा राहील, असा सवाल स्थानिक महिलांनी उपस्थित करीत आहेत . सुरू होत या विक्रेत्यांविरूद्ध काही सुज्ञ नागरिकांमध्येही रोष आहे. येथील अवैध दारू विक्री १०० टक्के बंद व्हावी यासाठी काल महिलांनी सांगोला पोलिसांना निवेदन दिले आहे. विशेषतः पोलिसांनी दारू विक्रेत्याची साठगाठ असून दारू विक्रेते त्यांना लाच देतात व पोलिसांच्या आशीर्वादाने हा अवैध दारू विक्री धंदा राजरोसपणे सुरू आहे.अशी ही चर्चा पुढे येत आहे. येणाऱ्या काळात सांगोला पोलिसांनी योग्य कारवाई नाही केली तर गृहमंत्र्यांना भेटू असा इशारा हि महिलांनी दिला आहे. ग्रामपंचायतीच्या सरपंच यांच्यासह माजी सरपंच तसेच सदस्य यांनी नव्हे तर गावातील इतर महिलांनी पुढाकार घेऊन दारूबंदीसाठी थेट पोलिसात मागणी केली आहे. यावर पोलीस निरीक्षक कोणती भूमिका घेणार याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागून आहे. सदर निवेदन देतेवेळी सरपंच प्रियांका गडहिरे, उपसरपंच लक्ष्मी घुणे, माजी सरपंच सत्यभामा गडहिरे, प्रमिला गडहिरे, ललिता खरात, शितल सोपे, मयुरी कांबळे, सामाजिक नेत्या सोनाली ताई शिंदे व जयश्री सावंत, यांच्या सह अनेक महिला उपस्थित होत्या.

## संग्रामनगर येथे ९२ हजारांची घरपोडी

**सुराज्य/सोलापूर**

संग्रामनगर (ता.माळशिरस) येथे राहणाऱ्या विजयकुमार कांतीलाल गांधी यांच्या बंद घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडून चोरट्याने रोख २४ हजार रुपये, चांदीची नाणी,आणि ६ ग्रॅम सोन्याचे दागिने असा एकूण ९२ हजाराचा ऐवज पळवला.ही चोरी शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. अकलूज पोलिसात याची नोंद झाली असून फौजदार जगताप पुढील तपास करीत आहेत.

## कंदलगाव येथे दुधाच्या कॅनने मारहाण

कंदलगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील एसटी स्टँड जवळ पूर्वीच्या भांडणावरून दुधाचे कॅन आणि दगडाने केलेल्या मारहाणीत हालप्पा गोरख व्हनमाने (वय ३४ रा.कंदलगाव) हे जखमी झाले. ही घटना रविवारी सकाळच्या सुमारास घडली.

त्यांना मंद्रुप येथे प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना सचिन व्हनमाने, शिवाजी व्हनमाने आणि अन्य तिघांनी मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



## विद्यार्थ्यांनी स्वावलंबी बनण्याचा निर्धार करावा :शीतल म्हेत्रे

**सुराज्य/अक्कलकोट**

विद्यार्थ्यांनी स्वतः स्वावलंबी बनण्याचा निर्धार करावा. जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, कष्ट, व प्रामाणिकपणा या पंचसूत्रीचा वापर करून जीवनात यशस्वी होऊन दाखववावे.असे आवाहन युवा नेत्या कु. शीतल सिद्धाराम म्हेत्रे यांनी जीवन ज्योती क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीनाथ हायस्कूल सोलापूर येथे दहावी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी बोलताना केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक टी. वाय. जमादार हे होते. व्यासपीठावर श्रीनाथ हायस्कूलचे मुख्याध्यापक सातलिंग शटगार, देवराज प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका आशाराणी डोके, स्मिताराणी चिवटे, संतोष बिराजदार, गिरीश शिंदे, संतोष पवार, बाबा बनसोडे आदी उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत, अतिथींचा परिचय प्रास्ताविक मुख्याध्यापक सातलिंग शटगार यांनी केले. यावेळी देवराज प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका आशाराणी डोके यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थी हरी पिटला, मुजफ्फर शेख, कीर्ती मदभावी, शिफा मुजावर यांनी शिक्षकांबद्दल व शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सहशिक्षक संतोष बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन संतोष पवार यांनी केले तर आभार गिरीश शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता प्रीती भोजनाने करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्मिताराणी चिवटे, बाबा बनसोडे, मल्लिकार्जुन कोळी, अशोक विजापुरे, चंद्रकला कांबळे मावशी आदींनी परिश्रम घेतले. शेवटी सामूहिक फोटो घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## माढा निरंकारी मंडळाच्यावतीने माढ्यातील सार्वजनिक पाणवठ्यांची स्वच्छता

### बाबा हरदेवसिंहजी महाराज जन्मदिन गुरूपूजा दिन म्हणून साजरा

**सुराज्य/माढा**

माढ्यातील संत निरंकारी मंडळाच्या वतीने शहरातील अनेक सार्वजनिक पाणवठ्याच्या ठिकाणी संपूर्ण साफसफाई करीत गुरूपूजा दिन साजरा करण्यात आला.

संत निरंकारी मंडळाचे सद्‌गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचा जन्मदिन औचित्य साधून सद्‌गुरू माता सदिक्षाजी महाराज यांच्या आशीर्वादाने गुरूपूजा दिन संपूर्ण भारत देशात साजरा केला जात असून या अनुषंगाने स्वच्छतेचे काम केले जात आहे.

या अनुषंगाने माढा शहरातील मंगळवार पेठेतील सार्वजनिक पाणीपुरवठ्याची जुनी विहीर मनकर्णा ओढा बेंद ओढा आणि माढेश्वरी मंदीर परिसराची साफसफाई आणि स्वच्छता करण्यात आली. ज्या ज्या ठिकाणी पाणी साठते अशा विहिरी तलाव पाझर तलाव ओढे अशा ठिकाणचे गवत शैवाल पाण्यात टाकला गेलेला कचरा विविध वनस्पती काढून ही स्वच्छता करण्यात आली. पाण्याचे जे स्त्रोत आहेत ते स्वच्छ करणे. स्वच्छ जल... स्वच्छ मन, जल है तो कल है अशा उक्तीप्रमाणे ही मोहीम राबवण्यात



आल्याचे माढा ब्रांच मुखी समाधान राऊत यांनी सांगितले. या मोहिमेचे उद्घाटन प्रसंगी नगराध्यक्षा ॲड. मिनलताई साठे आरोग्य सभापती विकास साठे नगरसेवक अजिनाथ माळी मंडळाचे मुखी समाधान राऊत दत्तात्रय मोरे ज्ञानेश्वर पायगण चांदभाई तांबोळी नवनाथ बोराटे महेश हणमे भाऊसाहेब गाडे बिभीषण मुंगसे शंकर उबाळे अरूण करळे आदिसह माढा निरंकारी मंडळाचे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये महिला भक्तांची उपस्थिती लक्षणीय होती.

माढा शहरातील सांडपण्याचा नैसर्गिक प्रवाह हा मनकर्णा नदीकडे (ओढा) आहे. नवीन विकास आराखड्यात आरक्षित झालेल्या सांडपाणी प्रकल्पाचे चुकीच्या ठिकाणचे आरक्षण बदलण्याची मागणी करण्यात आली आहे. येथील पाणी सांडपाण्यामुळे खराब होते आहे. यासाठी सांडपाणी प्रक्रिया उद्योग प्रकल्पाची मागणी शासनाकडे केली असून येत्या काही दिवसात ती मार्गी लागण्याची अपेक्षा आहे. यानंतर माढेश्वरी मंदीर ते भांगेवस्ती दरम्यान मनकर्णा ओढ्याच्या काठी हा प्रकल्प उभारण्याचा मानस नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे यांनी यावेळी व्यक्त केला.

# आरबीआयचा दणका

## पाच सहकारी बँकांवर आर्थिक निर्बंध, व्यवहारांवर मर्यादा

- महाराष्ट्रातील दोन बँकांचा समावेश
- एका बँकेतून फक्त ५ हजार काढता येणार

सुराज्य/नवी दिल्ली

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं देशातील पाच सहकारी बँकांवर विविध प्रकारचे निर्बंध घातले आहेत. पाच पैकी दोन बँका या महाराष्ट्रातील आहेत. सोलापूर जिल्ह्यातील अकलूजमधील शंकरराव मोहिते पाटील सहकारी बँक, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद या दोन बँकांचा त्यामध्ये समावेश आहे. तर उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशमधील एका बँकेवर निर्बंध घालण्यात आले आहेत.**

---




सोलापूर जिल्ह्यातील अकलूजमधील शंकरराव मोहिते-पाटील सहकारी बँक, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद, एचसीबीएल को-ऑपरेटिव्ह बँक लखनऊ, शिमशा सहकार बँक नियामिथा, मद्दूर, मंड्या जिल्हा कर्नाटक आणि उरवकोंडा को-ऑपरेटिव्ह टाऊन बँक, उरवकोंडा या पाच बँकांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. रिझर्व्ह बँकेनं पाच बँकांमधून पैसे काढण्यावर निर्बंध घातले आहेत. तर, पुढील सहा महिन्यांपर्यंत हे निर्बंध लागू असतील. आरबीआयच्या परवानगीशिवाय कर्ज वाटप, गुंतवणूक, पैशांचं वर्गीकरण इतर बाबींवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

एचसीबीएल को-ऑपरेटिव्ह बँक लखनऊ, शिमशा सहकार बँक नियामिथा, मद्दूर, मंड्या जिल्हा कर्नाटक आणि आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित औरंगाबाद या तीन बँकांमधून खातेदारांना पैसे काढण्यास मनाई करण्यात आली आहे.

शंकरराव मोहिते-पाटील सहकारी बँक, अकलूज आणि उरवकोंडा को-ऑपरेटिव्ह टाऊन बँक, उरवकोंडा बँकेच्या ग्राहकांना ५ हजारांपर्यंत रक्कम काढता येणार आहे. आरबीआयनं या पाच बँकांमधील ठेवीदारांसाठी एक सूचना देखील जारी केली आहे. डिपॉझिट इन्सुरन्स अँड क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशनचं या पाच बँकांतील ठेवीदारांच्या ठेवींना ५ लाख रुपयांपर्यंतचं विमा संरक्षण असेल, असं आरबीआयन म्हटलं आहे.

आरबीआयकडून वेळोवेळी बँकांच्या कामकाजाचा आढावा घेतला जातो. ज्या बँकांच्या कामकाजाबद्दल तक्रारी किंवा आर्थिक समस्या असतील त्या बँकांची माहिती घेऊन आरबीआय वेळोवेळी कारवाई करत असते. सध्या आरबीआयनं केलेल्या कारवाईत महाराष्ट्रातील दोन बँकांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. एका बँकेतून कसल्याही प्रकारची रक्कम काढता येणार नाही. तर, सोलापूरच्या अकलूजमधील शंकरराव मोहिते-पाटील सहकारी बँकेतून ठेवीदारांना ५ हजारांपर्यंत रक्कम काढता येणार आहे.

# ५२ वर्षांपासून माझ्याकडे घर नाही

## १९७७ सालच्या घटनेमुळे राहुल गांधी भावूक

सुराज्य/नवी दिल्ली

**'भारत जोडो यात्रेअंतर्गत जनतेसोबत संवाद साधल्यानंतर राहुल गांधी यांनी रविवारी काँग्रेसच्या अधिवेशनातूनही जनतेला संबोधित केलं. यावेळी त्यांनी त्यांच्यासोबत १९७७ साली घडलेली एक भावूक घटना शेअर केली. यानिमित्ताने राहुल गांधी यांचे घराबाबतचे मत स्पष्ट झाले. तसंच त्यांच्यालेखी घर काय आहे, घराबाबतच्या संकल्पना काय आहेत? हे त्यांनी या निमित्ताने शेअर केलं आहे.**



राहुल गांधी म्हणाले की, '१९७७ सालची गोष्ट आहे. निवडणुका लागल्या होत्या. तेव्हा मला निवडणुकांमधलं काही कळायचं नाही. मी सहा वर्षांचा होतो. एकदा घरात वेगळं वातावरण होतं. त्यामुळे मी आईला विचारलं की, मम्मी, काय झालं?' आई म्हणाली, 'आपण घर सोडतोय.' मी विचारलं की, 'आपण घर का सोडतोय?' तेंव्हा मला पहिल्यांदा कळलं की हे आपलं घर नाहीय. हे सरकारचं घर आहे. आता आपल्याला येथून जायचं आहे. मी आईला विचारलं की, 'आई कुठे जायचं आहे?' तेव्हा ती म्हणाली की, 'नाही माहिती कुठे जायचं.' मी हैरान झालो. मी विचार केला होता की ते आमचं घर आहे. तेव्हापासून आमच्याकडे घर नाही. ५२ वर्षे झाली, माझ्याकडे घर नाही. आमच्या कुटुंबाचं घर अलाहाबाद येथे आहे. पण तेही आमचं घर नाही. त्यामुळे जे घर असतं त्यासोबत माझं वेगळं नातं असतं.'

मी बारा तुघलक लेनमध्ये राहतो. पण ते माझ्यासाठी घर नाही. त्यामुळे मी भारत जोडो यात्रेसाठी जेंव्हा कन्याकुमारीपासून निघालो. मी स्वतःला विचारलं की माझी जबाबदारी काय आहे? मी भारताचं दर्शन करायला निघालो आहे, भारताला समजण्यासाठी निघालो आहे. हजारो लाखो लोक माझ्यासोबत चालताहेत. गर्दी आहे. मग माझी काय जबाबदारी आहे? मी थोडा वेळ विचार केला. मला कल्पना सुचली. पुढच्या चार महिन्यांसाठी हे माझ्यासाठी घर आहे. हे घर माझ्यासोबत चालेल. सकाळी सहा वाजल्यापासून सायंकाळपर्यंत हे घर माझ्यासोबत चालेल. या घरात जो कोणी येईल गरीब, श्रीमंत, अबालवृद्ध, कोणत्याही धर्माचा, राज्याचा असो, भारताबाहेरील असो, प्राणी असो, त्याला हे वाटलं पाहिजे की मी आज माझ्या घरी आलो आहे. जेव्हा ते येथून जातील तेव्हा त्याला वाटलं पाहिजे की मी माझ्या घराला सोडून जातोय. ही फार लहान कल्पना होती. पण त्याचं महत्त्वं मला मी यात्रा सुरू केल्यानंतर समजलं, असंही राहुल गांधी म्हणाले.

# समाजाच्या सामर्थ्याने देशाची शक्ती वाढते

## 'मन की बात'मधून पंतप्रधान मोदींचे वक्तव्य

सुराज्य/नवी दिल्ली

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी 'मन की बात'च्या माध्यमातून संपूर्ण देशाला संबोधित करत आहे. 'मन की बात'चा हा ९८वा भाग आहे. लोकसहभागाच्या अभिव्यक्तीसाठी तुम्ही सर्वांनी मन की बात हे एक अप्रतिम व्यासपीठ बनवले आहे.



यावेळी मोदींनी 'मन की बात' या माध्यमातून मोठं वक्तव्य केलं आहे. समाजाच्या सामर्थ्याने देशाची शक्ती वाढते, असं नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.

आम्ही 'मन की बात'च्या वेगवेगळ्या एपिसोडमध्ये पाहिले आहे की, समाजाच्या सामर्थ्याने देशाची शक्ती म्हणजेच ताकद कशी वाढते. मला तो दिवस आठवतोय, जेव्हा आपण 'मन की बात'मध्ये भारताच्या पारंपारिक खेळांना प्रोत्साहन देण्याबद्दल बोललो होतो. त्यावेळी देशात भारतीय खेळांमध्ये सहभागी होण्याची, आनंद घेण्याची आणि शिकण्याची लाट उसळली होती, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

### 'मराठी ज्ञानभाषा अभियान' उपक्रम

सुराज्य/मुंबई : मराठी भाषेची 'ज्ञानभाषा' म्हणून ओळख निर्माण व्हावी याकरिता अच्युत गोडबोले यांच्या 'मराठी ज्ञानभाषा अभियान' या उपक्रमाला भारतातील सहकार क्षेत्रातील सारस्वत बँक पाठिंबा देत आहे.

या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील ५०० वाचनालयांना अच्युत गोडबोले यांच्या विविध ज्ञानप्रणालीतील एकूण २५ पुस्तकांचा संच मोफत पाठवला जात आहे. जेणेकरून मायभाषेत आवर्जून वाचन करणाऱ्या मराठी वाचकांना उपयोग होईल व मराठीचा एक 'ज्ञानभाषा' म्हणून प्रसार होईल.

### 'भाग्य दिले तू मला' मालिकेचा विशेष भाग

सुराज्य/मुंबई : राज-कावेरी यांचा विवासोहळा आनंदात पार पडणार आहे. लग्न म्हणजे नव्या आयुष्याची सुरुवात असते. लग्नासाठी कावेरीचा खास मराठमोळा लूक असणार आहे. 'भाग्य दिले तू मला' या मालिकेचा दोन तासाचा विशेष भाग आज दु.१ व संध्या ७ वा. कलर्स मराठीवर प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

# आठ तासांच्या चौकशीनंतर सिसोदिया यांना अटक

सुराज्य/नवी दिल्ली

**दिल्ली दारू घोटाळ्याप्रकरणी सीबीआयने दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया अटक केली आहे. तत्पूर्वी मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी सीबीआयने त्यांची चौकशी केली. या चौकशीसाठी ते सकाळी ११.१० वाजता दिल्लीतील सीबीआयच्या मुख्य कार्यालयात पोहोचले होते.**



चौकशीला सामोरे जाण्याआधी ते आप पक्षाचे नेते संजय सिंह आणि सौरभ भारद्वाज यांच्यासह राजघाटावर पूजा करण्यासाठी गेले होते. अटक होण्याआधी सिसोदिया यांनी ट्वीट करत म्हटलं होत की, ''आज पुन्हा सीबीआय मुख्यालयात जात आहे, मी तपासात पूर्ण सहकार्य करेन. लाखो मुलांचे प्रेम आणि करोडो देशवासियांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत.'' त्याच ट्विटमध्ये ते म्हणाले की, ''मला काही महिने तुरुंगात राहावे लागले तरी मला पर्वा नाही. देशासाठी ज्या भगत सिंहांना फाशी देण्यात आली, त्यांचा मी अनुयायी आहे. अशा खोट्या आरोपांमुळे तुरुंगात जाणे ही छोटी गोष्ट आहे.''

# झारखंडमध्ये बर्ड फ्ल्यूचे थैमान

## चार हजार कोंबड्या, बदकांची कत्तल करण्यास सुरुवात

सुराज्य/झारखंड

झारखंडमधील बोकारोमध्ये बर्ड फ्ल्यूने थैमान घातले आहे. बर्ड फ्ल्यूचा संसर्ग रोखण्यासाठी आता येथील ४ हजार कोंबड्या आणि बदकांना मारण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. लोहांचलच्या फार्ममधील कडकनाथ कोंबडीमध्ये H5N1 विषाणूची लागण झाल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. बर्ड फ्ल्यूमुळे आतापर्यंत ८०० पक्ष्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे १०३ कोंबड्यांना मारावे लागले होते.



एका वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, कोंबडी आणि बदकांसह एकूण ३,८५६ पक्षी मारण्याची प्रक्रिया शनिवारी संध्याकाळी उशिरा लोहांचलच्या शेतातील एक किलोमीटरच्या परिघात सुरू झाली. या प्रक्रियेला वेळ लागत असल्याने रविवारीही पक्षी मारण्याचे काम सुरूच राहणार असल्याचे रांची येथील इन्स्टिट्यूट ऑफ ॲनिमल हेल्थ अँड प्रोडक्शनचे संचालक डॉ. बिपिन बिहारी मेहता यांनी सांगितले.

# एसटीच्या ताफ्यात आणखी २०० हिरकणी

## मार्चअखेर प्रवाशांच्या सेवेत होणार दाखल

सुराज्य/मुंबई

मुंबई-पुणे, मुंबई-नाशिक आणि मुंबई-नगर या मार्गांवर प्रवास करणाऱ्यांना येत्या महिन्याअखेर एसटीचा नवा पर्याय उपलब्ध होणार आहे. एसटीच्या निमआराम श्रेणीतील २०० हिरकणी बसची बांधणी वेगाने सुरू असून, मार्चअखेर त्या प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत.

सध्या एसटी ताफ्यात बसगाड्यांची प्रचंड कमतरता आहे. नव्या हिरकणीच्या समावेशानंतर हा ताफा वाढणार आहे.



२०२२-२३ आर्थिक वर्षात महामंडळाने ७०० चॅसी खरेदी केल्या होत्या. एसटीच्या तीन मध्यवर्ती कार्यशाळांत यातील ४५० चॅसीवर साधी बसबांधणी सुरू आहे. २०० निमआराम आणि ५० शयनयान श्रेणीतील बसबांधणी खासगी संस्थेकडून बांधण्यात येत आहे.

# काश्मिरी पंडिताच्या हत्येने हादरले जम्मू काश्मीर

सुराज्य/मुंबई

जम्मू काश्मीरमध्ये टार्गेट करून हत्या करणं हे थांबताना दिसत नाही. पुलवामात दहशतवाद्यांनी एका काश्मिरी पंडिताची गोळ्या झाडून हत्या केली. संजय शर्मा असं या काश्मिरी पंडिताचं नाव होतं तो बँक कर्मचारी होता. पोलिसांनी ट्विट करून ही माहिती दिली आहे. तसेच जम्मू काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनीही याबाबत ट्विट केलं आहे. तसंच काश्मिरी पंडितांच्या हत्या कधी थांबणार, असा प्रश्न उपस्थित केला आहे.

# औरंगाबाद महापालिकेचा कारभार 'ईडी'च्या रडारवर

## आवास योजनेची कागदपत्रे घेतली ताब्यात

सुराज्य/औरंगाबाद

पंतप्रधान आवास योजनेच्या निविदा प्रक्रियेतील घोटाळ्याची कागदपत्रे अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) ताब्यात घेतली आहेत. या यंत्रणेने मंत्रालयातून कागदपत्रे घेतल्याची माहिती महापालिकेचे प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांनी दिली. त्यामुळे आता महापालिकेचा कारभार 'ईडी'च्या रडारवर आल्याचे मानले जात आहे.




प्रधानमंत्री आवास योजनेसाठी महापालिकेने राबवलेल्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली होती. या तक्रारीवरून राज्य सरकारने गृहनिर्माण विभागाच्या अवर सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली. या समितीला निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याचे आदेश दिले. अवर सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीला सहकार्य करण्यासाठी दोन उपसमित्या स्थापन करण्यात आल्या.

उपसमितींच्या चौकशी अहवालाच्या आधारे अवर सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने आपला अहवाल सरकारला सादर केला. या अहवालाचा अभ्यास करून राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने निविदा प्रक्रिया प्रकरणात झालेल्या घोटाळाप्रकरणी फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याचे आदेश दिले, अशी माहिती डॉ. चौधरी यांनी दिली.

# थोरात यांच्या भूमिकेमुळे अजितदादा तोंडघशी पडले



सुराज्य/अहमदनगर

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी विधिमंडळ पक्ष गटनेतेपदाचा राजीनामा दिल्याच्या बातम्या आल्या होत्या. विरोधीपक्ष नेते, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांनीही थोरात यांनी आपल्याला राजीनामा दिल्याचे सांगितल्याचे म्हटले होते. आता मात्र, थोरात यांनी प्रथमच यावर भाष्य केले असून मी राजीनामा दिल्याचे कोणी सांगितले? असा प्रतिप्रश्न प्रसारमाध्यमांना केला आहे. यामुळे थोरात यांच्या राजीनाम्याची प्रसार माध्यमांना माहिती देणाऱ्या अजित पवार यांची चांगलीच अडचण झाली आहे.**

काँग्रेसच्या जयपूर येथील राष्ट्रीय अधिवेशनासाठी थोरात गेले आहेत. तेथे महाराष्ट्रातील प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी त्यांच्याशी संवाद साधला त्यावेळी राजीनाम्याबद्दल प्रश्न विचारता थोरात यांनी मी राजीनामा दिल्याचे कोणी सांगितले? असा प्रतिप्रश्न केला.

पक्षस्तरावर या संदर्भात चर्चा सुरू आहे. सर्वच पक्षांत हे असेच चालते. मात्र, काँग्रेससंबंधी याची जास्त चर्चा होते, अशी पुस्तीही थोरात यांनी जोडली. विधान परिषदेच्या नाशिक पदवीधर मतदारसंघातील उमेदवारीवरून काँग्रेसमध्ये संघर्ष झाला होता. थोरात यांचे भाचे आमदार सत्यजित तांबे यांनी बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. तेव्हा रुग्णालयात उपचार घेत असलेले थोरात आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यात मतभेद झाली. यावरून थोरात यांनी पक्षश्रेष्ठींकडे तक्रार केली आणि आपला विधिमंडळ गटनेते पदाचा राजीनामाही पाठविल्याच्या बातम्या येऊ लागल्या.

# आजारी गायींच्या प्रकृतीत सुधारणा

सुराज्य/कणेरी

कणेरी मठावरील विषबाधा झालेल्या गाईंच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत आहे. सलाईन उपचार थांबवण्यात आले असून शनिवारी गाईंनी आहार सुरू केला आहे. गाई मृत्युसंख्येत वाढ झालेली नाही.

कणेरी येथील सिद्धगिरी मठामध्ये विषबाधा झाल्याने भारतीय देशी गाई दगावल्या होत्या. शिळे अन्न खाल्ल्यामुळे विषबाधा झाली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली. याची दखल घेऊन जिल्हा पशुसंवर्धन विभागाने अस्वस्थ गाईंवर उपचार



सुरू ठेवले आहेत. त्यांची दोन पथके तेथे तैनात केली आहेत. आता गाईंच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत आहे.

याबाबत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. वाय. ए. पठाण शनिवार म्हणाले, 'चार गायींना सलाईन द्वारा उपचार केले जात होते. त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झाली आहे. त्यांनी चारा, पशुखाद्य असा आहार सुरू ठेवला आहे. गायी दगावण्याच्या संख्येमध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. गायींचा मृत्यू नेमका कशामुळे झाला यासाठी व्हिसेरा पुणे येथील प्रयोगशाळेला पाठवण्यात आला आहे. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर गाईंच्या मृत्यूच्या कारणाचा उलगडा होईल.

दरम्यान, मोठ्या प्रमाणात गायी मृत्युमुखी पडल्याने शासकिय पातळीवरही त्याची गंभीर दखल घेतली आहे. पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त सचिनचंद्र प्रतापसिंह, प्रादेशिक आयुक्त डॉ. संतोष पाचपोर, सहआयुक्त रोग अन्वेषण विभाग डॉ. घुलपुरे तसेच कोल्हापूर जिल्हाधिकारी डॉ. राहुल रेखावर आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कणेरी मठातील गो शाळेला भेट दिली. त्यांनी जखमी गाई व इतर गाईंची पाहणी केली.

# कांद्याच्या दरात का होतेय घसरण?

## सरकार कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बळ देणार का?

सुराज्य/नाशिक

**राज्यात सर्वात जास्त कांद्याचे उत्पादन नाशिक जिल्ह्यात घेतले जाते. यामुळे आशियातील सर्वात मोठी कांद्याची मोठी बाजारपेठ आहे. दरम्यान अवकाळी पाऊस, राज्य सरकारची धोरणे यामुळे पुन्हा नाशिक जिल्ह्यातच कांदा शेतकऱ्यांना रडवत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. येत्या काही दिवसात हे दर आणखी खाली कोसळतील अशी भीती व्यक्त केली जात आहे.**

पंधरा दिवसांपूर्वी ज्या उच्च प्रतीच्या कांद्याला क्विंटलला तीन ते चार हजार रूपये भाव मिळत होता, तोच कांदा आज व्यापाऱ्यांकडून दीड ते दोन हजार रुपयांनी खरेदी केला जात आहे. यामुळे नाशिकमध्ये कांद्याचे दर पडल्याचे दिसत आहे. हा कांदा दर पडल्याने राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. तसेच नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकरी संताप व्यक्त केला आहे.

**मुख्यमंत्र्यांनी आश्वासन पाळावे**

मागच्या काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नसल्याचे सांगितलं होत. परंतु कांद्याच्या दरात मोठी घसरण होत असल्याने याकडे कोण लक्ष देणार का? असा सवालही शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान कांद्यापाठोपाठ राज्यात टोमॅटो उत्पादक



शेतकरीही संकटात सापडला आहे. टोमॅटोच्या दरात मोठी घसरण झाल्याने टोमॅटोला कवडीमोल दराने भाव मिळत आहे. कांदा आणि टोमॅटोच्या घसरणीमुळे शेतकऱ्यांच्या हातात चार पैसेही राहत नसल्याचे सध्या चित्र आहे.

राजस्थानमधील नवीन कांद्याची होणारी आवक, मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणावर आलेला कांदा, यासोबतच कर्नाटकच्या शेतकऱ्यांनी उशिरा केलेली कांद्याची लागवड याचा परिणाम म्हणून उन्हाळी कांद्याचे दर कोसळले असून येत्या काही दिवसात हे दर आणखी खाली येतील अशी भीती व्यक्त केली जातीय. असे झाले तर कांदा उत्पादक शेतकरी आणखी अडचणीत येण्याची शक्यता आहे.

नाशिक जिल्ह्यात कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. कांद्याची प्रतही उत्तम असल्याने या कांद्याला देशभरातून चांगली मागणी असते. कांद्याचा उत्पादन खर्च प्रति किलोला २२ ते २५ रुपये येतो. मात्र सध्या हा खर्चही निघत नसल्याने बळीराजासमोर आर्थिक संकट उभं राहिले आहे.



पावनं ऽऽ रामराम

काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# पक्ष हितासाठी 'मौनम् सर्वार्थ साधनम्'

डी.एस.गायकवाड

**अलीकडील काळात भाजपामध्ये अंतर्गत श्रेयवादावरून संघर्षाची ठिणगी पडली असली तरी मोहिते पाटलांनी मात्र यावर मौनम् सर्वार्थ साधनम् भूमिका स्वीकारलेली दिसत आहे. श्रेय वादाच्या लढाईत न पडता अखंडपणे जन हिताचे कार्य करीत राहणे व यामाध्यमातून पक्षाच्या विस्तार कक्षा वाढविणे हाच मूळ उद्देश त्यांचा अधोरेखित होताना दिसतो आहे. म्हणूनच पाठीमागील काही घटनांवर त्यांची भूमिका भाजपा पक्षाला बळकटी प्राप्त करून देणारी आहे.**

राजकारण शांततेने आणि संयमाने करण्याची भूमिका आजपर्यंत मोहिते-पाटील यांनी निभावली आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिते पाटील परिवाराची धुरा सांभाळणारे आ.रणजितसिंह मोहिते पाटील हे सध्या भाजपासाठी ॲग्रेसिव्ह भूमिका निभावत असताना विविध विकास कामांना प्राधान्य देत ते सोडविण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. प्रत्येक प्रश्नाला ते राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. त्यामुळे अनेक प्रश्न सुटत आहेत, अनेक प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहेत पण अशात श्रेय वादावरून धुसफूस सुरू असताना दिसत आहे.

नीरा देवधर प्रकल्पाला मिळालेला निधी,रेल्वे प्रश्न अशा विषयावरून पाठीमागील काही दिवसात भाजपामध्येही आलबेल नसल्याचे चित्र समोर आले होते.पण अशा अवस्थेत देखील अबोल शांतता पाळत







## विकासाला गळ, दुहिला नको बळ

वरिष्ठ पातळीवरील भाजपा नेते मंडळी मोहिते पाटील बंधूंवर खुश आहेत. मग अशा वातावरणात कुणी मिठाचा खडा टाकत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करून व्यापक पक्ष हीतासाठी सर्वांना सोबत व विश्वासात घेऊन कार्याचा गाडा ते हाकताना दिसत आहेत. विकासाला गळ, दुहिला नको बळ अशा पक्ष हिताच्या पावित्र्यात सध्या ते दिसत आहेत.

## ताकदीला दुहीची नजर नको

माढा लोकसभा मतदारसंघात भाजपा पक्षाची बांधणी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, पक्षाचे संघटन महामंत्री धैर्यशील मोहिते पाटील यांनी जोरकसपणे केली आहे. गावागावात बूथ रचना निर्माण करून संघटनात्मक जाळे निर्माण केले आहे. त्यामुळे पक्षीय संघटनात्मक ताकदीला दुहीची नजर लागू नये यासाठी ते काही गोष्टींकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत.शेवटी यशाची जबाबदारी आपल्यालाच पार पाडावी लागणार आहे याची जाणीव मनात ठेवून ते सक्रियपणे कार्यरत असताना दिसत आहेत.

आमदार रणजितसिंह मोहिते पाटील हे आपल्या राजकीय प्रगल्भतेचे दर्शन देताना दिसत आहेत. मुळात माढा लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असताना मोहिते पाटील यांनी आपल्या अद्वितीय राजकीय किमयेतून या मतदार संघावर भाजपाचे वर्चस्व निर्माण केले आहे. मतदारसंघाचा चेहरा मोहरा त्यांनी बदललेला आहे. त्यामुळे भाजपासाठी माढा लोकसभा मतदारसंघात अनुकूल वातावरण असताना विनाकारण पक्षीय एकतेच्या वातावरणाला गालबोट लागू नये याची खबरदारी मोहिते-पाटील काही घडणाऱ्या अघटीत घटनांवर मौन धारण करून, अबोल राहून घेताना दिसताहेत.

मोहिते पाटील ही एक मोठी शक्ती आहे. सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय रणांगणावर या शक्तीची चलती आहे, हे राजकीय इंगित पक्षाला देखील माहिती आहे. प्रदेशाध्यक्ष पदावर कार्यरत असताना चंद्रकांत पाटील यांनी देखील हे जाहीररित्या मान्य केले आहे.राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नेहमीच आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या पंखात बळ भरण्याचे कार्य केले आहे. जनहिताच्या व्यापक दृष्टिकोनातून रणजितसिंह पाटील हे सध्या कार्य करताना दिसत आहेत. कोट्यावधीचा निधी तालुक्याला जिल्ह्याला मिळताना दिसतो आहे. विकास कामासाठी अविरतपणे काम करून जास्तीत जास्त निधी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत ते पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपाची ध्येयधोरणे तळागाळात राबविताना आ. रणजितसिंह व धैर्यशील मोहिते पाटील यांनी गावोगावात भाजपाची सक्षम टीम निर्माण केलेली दिसते आहे. धोरणात्मक आणि रचनात्मक बांधणी काय असते याचा आदर्श धैर्यशील मोहिते पाटील यांनी दाखवून दिला आहे.

# मतदारसंघ सेनेकडे; जास्त इच्छुक भाजपकडे

निसार तांबोळी

**आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सांगोला मतदारसंघातील विविध पक्षाचे नेते तयारीला लागले आहेत. मात्र सर्वाधिक इच्छुक भाजपकडे आहेत. या विधानसभा मतदारसंघात आ. शहाजीबापू शिवसेनेकडून धनुष्यबाणावर निवडून आले आहेत. त्यामुळे मतदारसंघ सेनेकडे आणि इच्छुक जास्त भाजपकडे, अशी परिस्थिती सांगोला मतदारसंघात झाली आहे. बाकी शेकापचीही ताकद मतदारसंघात चांगली आहे. राष्ट्रवादी आणि कॉँग्रेस पक्ष केवळ एका नेत्याच्या आधारावर सांगोल्यात उभा आहे.**



भाजपकडून तालुकाध्यक्ष चेतन सिंह केदार हे विधानसभा निवडणूक लढवण्यास तयारी करीत आहेत. तसे पाहता त्यांचे सासरे श्रीगोंद्याचे आमदार बबनराव पाचपुते यांच्यामार्फत ते उमेदवारीसाठी जोरदार प्रयत्न करत आहेत. तालुकाध्यक्ष झाल्यापासून चेतनसिंह केदार पक्ष वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. पक्षातील सर्वांना बरोबर घेऊन जाणारा नेता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यामुळे ते भाजपाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत.

दुसरीकडे भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत देशमुख हे विधानसभा उमेदवारीचे दावेदार होते. ते प्रभावी होते परंतु एका प्रकरणात अडकल्याने ते राजकीय पक्षापासून दूर गेले आहेत. त्यांचे भाऊ भाजपाचे किसान सेलचे प्रांतिक उपाध्यक्ष शशिकांत देशमुख हेही भाजपकडून इच्छुक असल्याचे बोलले जात आहे तसेच संभाजी आलदर, शिवाजीराव गायकवाड हेही भाजपाकडून उमेदवारीमध्ये इच्छुक आहेत. परंतु मॅन व मनी पॉवरने चेतनसिंह केदार यांचे पारडे जड असल्याचे सांगितले जाते. केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता असल्याने किसान रेल्वेच्या माध्यमातून विकास कामे झाल्यामुळे तालुक्यात भाजपाला चांगले दिवस आल्याचे केदार सांगत आहेत. पक्षाने उमेदवारी दिली तर निवडणूक लढविणार असल्याचे ते बोलून दाखवत आहेत.

### आ. शहाजीबापूंचे पारडे जड

विद्यमान आमदार शहाजी बापू पाटील यांनी गेल्या वर्षभरात दीड हजार कोटीहून अधिक निधी विकास कामासाठी आणला आहे. त्यामुळे सध्या तरी त्यांचे पारडे जड आहे. ते कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवून पक्ष मजबूत करीत आहेत. काय झाडी, काय डोंगर काय हॉटेलमुळे ते सांगोल्यासह संपूर्ण राज्यात फेमस झाले आहेत. त्यामुळे त्यांचा मतदारसंघावर करिष्मा आहे.

### शेकापची ताकद कायम

दुसरीकडे दिवंगत गणपतराव देशमुख यांच्या पश्चात शेकापला गळती लागेल, असे विरोधी पक्षाने गृहीत धरले होते. परंतु तसे काही झाले नाही. शेकापचा पूर्वीचा कार्यकर्ता आहे त्या ठिकाणी जोमात असून तो निवडणुकीची वाट पाहत आहे.

### कॉँग्रेस-राष्ट्रवादी एका नेत्याच्या आधारावर

राष्ट्रवादी कॉँग्रेसची भिस्त माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांच्यावर आहे. त्यांचाही पक्ष बदलाच्या वावड्या उडत आहेत जर त्यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी दिली तर तालुक्यातील राष्ट्रवादी कागदावरच दिसून येईल. दांडगा जनसंपर्क आणि जनतेची कामे करण्यात ते अग्रेसर असतात. प्रा. पी. सी. झपके यांच्यामुळे कॉँग्रेस पक्षाचे नाव आहे अन्यथा तोही पक्ष कागदावरच राहणार आहे. उद्धव ठाकरे गट पूर्वीचे जे शिवसैनिक आहेत ते आहे त्या ठिकाणी आहेत.

# आमदारकीचे स्वप्न पूर्ण होणार का?

संजय आठवले

मोहोळ विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार म्हणून संजय क्षीरसागर यांच्याकडे पाहिले जाते. त्यादृष्टीने क्षीरसागर यांनी सावधतेने आणि प्रसंगानुरूप तयारीही केली आहे. त्यामुळेच अलीकडच्या काळात त्यांनी किंगमेकर राजन पाटलांबद्दल विधान करताना सॉफ्ट आणि संयमाची भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. ही भूमिका क्षीरसागर यांचे यंदातरी आमदारकीचे स्वप्न पूर्ण करणार का याकडे तालुकावासियांचे लक्ष लागले आहे.

गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी मोहोळ येथे माजी आ. राजन पाटलांची भेट घेत त्यांना भाजप प्रवेशाचे निमंत्रण दिले. नंतर राजन पाटील यांनी नेहमीच्या शैलीत उत्तरे दिली होती मी एकटा या मतदारसंघाचा मालक नाही, ज्यांनी आम्हाला मतदान केलं, त्या जनता, कार्यकर्त्यांना विचारावे लागेल व त्यानंतर मी निर्णय घेईल, असे सांगितले. यापूर्वीही पाटलांनी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीची उमेदवारी देताना त्यांनी मतदार संघातील मतदारांना विचारूनच त्यांनी निर्णय घेतले आहेत. पाटील हे भाजपमध्ये जाणार अशी चर्चा अनेक महिन्यांपासून होत होती. या डॉ. सावंत यांच्या भेटीमुळे ती चर्चा अधिक गडद झरली आहे, असेच म्हणावे लागेल. त्यांचा भाजप प्रवेश संजय क्षीरसागर यांच्यासाठी आमदारकीचे दार उघडणार का? याची उत्सुकता क्षीरसागर समर्थकांना लागली आहे.

सध्या भाजपाचे संभाव्य उमेदवार म्हणून क्षीरसागर यांच्याकडेच पाहिले जाते. सध्या अलीकडच्या काळामध्ये त्यांनी राजन पाटलांबद्दल विधान करताना संयमाची भूमिका घेतली आहे. त्यांच्याच पक्षाचे त्यांचे विरोधक पाटलांवर तोंडसुख घेताना आपण पाहिले. परंतु संजय क्षीरसागर यांची भूमिका राजन पाटील यांच्याबाबत मवाळ दिसून येत आहे. त्यांचह ही भूमिका मोहोळ विधान सभेची उमेदवारी मिळावी व राजन पाटलांचे सहकार्य लाभावे यामुळेतर नव्हती ना ? असा प्रश्न निर्माण होत आहे. काही का असेना परंतु गोव्याचे मुख्यमंत्री सावंत यांची व राजन पाटील यांची भेट संजय क्षीरसागर यांच्या पथ्थ्यावर पडणार, असे वाटत आहे.

### उमेदवारीचे अधिकार पक्षाकडे की पाटलांकडे?

माजी आ. राजन पाटील हे भाजपमध्ये आल्यास मोहोळ मतदारसंघातून उमेदवार निवडीचे अधिकार भाजप त्यांना देणार का हा प्रश्न आहे. आतापर्यंत राष्ट्रवादीचे उमेदवार ठरवताना पाटलांचा शब्द अंतिम मानला जात होता, आता भाजपमध्ये ती परिस्थिती असण्याची शक्यता कमी आहे. मोहिते-पाटलांनी भाजपमध्ये प्रवेश केला तरी माळशिरसमधील उमेदवार हा भाजपने ठरवला होता.



# 'सहकार शिरोमणी'त परिवर्तनाचे वारे

सूरज सरवदे



**गेल्या पाच वर्षात तीन वेळा आर आर सी (जप्ती)ची कारवाई, एक वर्ष कारखाना बंद, चालू हंगामाचे बिल दुसऱ्या वर्षाला दिले जायचे. शेतकऱ्यांच्या तीव्र नाराजीमुळे यंदा सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत परिवर्तनाचे होणार असल्याचे सभासदांमध्ये चर्चा आहे. कारखाना चालवणाऱ्या माणसाकडे कारखाना देण्याची भूमिका सभासदांनी घेतली आहे.**

सहकार शिरोमणी साखर कारखान्यावर गेल्या स्थापनेपासून काळे यांचे वर्चस्व आहे. वसंतराव काळे यांच्या निधनानंतर कल्याणराव काळे यांच्याकडे कारखान्याची जबाबदारी आली. त्यांनी कारखान्याचे विस्तारीकरण केले. मात्र त्यांना पूर्ण क्षमतेने कारखाना चालवायला जमला नाही. अशीच परिस्थिती सिताराम महाराज साखर साखर कारखान्याची होती. दोन्ही कारखान्यामध्ये कुटुंबातीलच व्यक्तींवर महत्त्वाची जबाबदारी होती. मात्र, दोन्ही कारखाने काळे यांना वाढदिवसाच्या पूर्ण क्षमतेने चालवता आले नाहीत. त्या उलट सीताराम साखर कारखान्याचा कारभारी बदलल्यानंतर अमुलाग्र बदल कारखान्यात झाले. कधी नव्हते तेवढे गाळप काळुंगे यांनी करून दाखवले आहे. शेतकऱ्यांना वेळेवर ऊसाचे बिल मिळत आहे. गेल्या वर्षी काळुंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सिताराम साखर कारखान्याने विक्रमी ३ लाख ५० हजार मॅट्रिक टन गाळप केले होते. तर चालू हंगामात सुद्धा कल्याणराव काळे यांच्या सहकार शिरोमणी वसंतराव सहकारी साखर कारखान्या पेक्षाही कमी गाळप क्षमता असताना देखील काळुंगे यांनी ३ लाख २७ हजार मॅट्रिक टना पेक्षा जास्त उसाचे गाळप केले आहे तर सहकार शिरोमणीने २ लाख ९१ हजार मॅट्रिक टन ऊसाचे गाळप केले आहे. कल्याणराव काळे यांचा सहकार शिरोमणी कारखाना ३५०० मॅट्रिक टनाचा आहे तर सिताराम साखर कारखाना हा २५०० मॅट्रिक आहे. मात्र दोन वर्षात प्रत्येक हंगामात सिताराम साखर कारखान्याने ३ लाखापेक्षा जास्त गाळप करून दाखवले आहे. कारखान्याचा कारभारी बदलला की शेतकरी सभासदांचे दिवस देखील बदलतात याचा प्रत्येय सिताराम साखर कारखान्याने दाखवला आहे. गेल्या ३ वर्षांमध्ये सहकार शिरोमणीने आर. आर. सी. कारवाई केल्यानंतरच शेतकऱ्यांचे ऊस बिल दिले आहे तसेच कारखाना प्रशासनाला शासनाच्या थक हमीवर अवलंबून राहावे लागले होते. त्यात एक वर्ष कारखाना बंद ठेवण्याची वेळ कल्याणराव काळे यांच्यावर आली होती. त्यामुळे कारखान्याच्या निवडणुकीमध्ये कारखाना चालवणारा माणसाकडे कारखाना देण्याची भूमिका सभासदांची आहे.

### अभिजित पाटलांची भूमिका महत्वाची



विठ्ठल सहकारी साखर कारखान्यामध्ये परिवर्तन घडवल्यानंतर आता सहकार शिरोमणी कारखान्यामध्ये ही परिवर्तन घडणार असल्याचे बोलले जात आहे. अभिजीत पाटील यांच्याकडे विठ्ठल साखर कारखाना आल्यानंतर त्यांनी २५०० रुपये भाव दिल्यामुळे जिल्ह्यातील सर्व कारखान्यांना तीन- चारशे रुपयाने दर वाढवावा लागला आहे. त्यामुळे अभिजीत पाटील यांनी सहकार शिरोमणी कारखान्याची निवडणूक लढली तर परिवर्तन घडेल, असे बोलले जात आहे. त्यामुळे अभिजित पाटलांची भूमिका महत्वाची मानली जात आहे.

---

### माजी संचालकाने आणले काळेंना घाईला

सहकार शिरोमणी कारखान्याच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे उसाचे बिल मिळावे यासाठी कारखान्याचे माजी संचालक दीपक पवार यांनी वारंवार बिलासाठी पाठपुरावा केला होता. कारखान्यावर आर आर सी कारवाई करून उस बिले मिळवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत तसेच सिताराम साखर कारखान्याचे गुंतवणूकदारांना त्यांनी भरलेली रक्कम परत मिळवण्यासाठी त्यांनी मोठा लढा दिला आहे. त्यामुळे कल्याणराव काळे यांना त्यांनी चांगलेच घाईला आणले आहे. शेतकऱ्यांचे पैसे देण्यास त्यांना भाग पाडले आहे.



# राज्याच्या सत्ता संघर्षाचे पडसाद बार्शीतही उमटणार

सचिन अपसिंगकर

**२०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात न भूतो न भविष्यती अशी वैचारीक ध्रुव असलेल्या पक्षांची महाविकास आघाडी झाली. या काळातही विरोधी पक्ष असलेल्या भाजपा बरोबर महाविकास आघाडी सरकार विधीमंडळात आणि राजकीय सारीपाटावरही मोठा सामना रंगत होता. त्यानंतर अडीच वर्षांनी शिवसेनेला अभुतपूर्व धक्का देत तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठे बंड केले. आता सत्ताधारी भाजप-सेना आणि महाआघाडीमध्ये संघर्ष होत आहे. याचे उदाहरण पिंपरी-चिंचवड आणि कसब्याच्या पोटनिवडणुकीत दिसून येत आहे. या सत्तासंघर्षाचे पडसाद बार्शी तालुक्यातही उमटणार हे नक्की.**



बार्शी तालुक्याच्या राजकीय आघाड्याचा भगवंत केसरी कोण होणार यासाठी पाच वर्षे कुस्ती रंगत असते. तालुक्यातील ग्रामपंचायतीपासून ते अगदी बार्शीचा समावेश असलेल्या उस्मानाबाद लोकसभा मतदार संघातील लढतीचेही गंभीर पडसाद तालुक्याच्या राजकारणावर उमटतात. गेली पंचेवीस वर्षे बार्शीचे राजकारण अतिशय संघर्षमय आहे. बार्शीतल्या प्रमुख राजकीय नेत्याने आतापर्यंत शिवसेना, कॉँग्रेस, राष्ट्रवादी, भाजपा, असे भ्रमणतीचे वर्तुळही पूर्ण केले आहे. बार्शीचे राजकारण पूर्णपणे व्यक्तिनिष्ठ आहे. बार्शीत पक्षनिष्ठेला थारा नाही. बार्शीच्या राजकारणामध्ये आणि निवडणुकांमध्ये नेहमीच जातीय समिकरणे प्रभावी ठरली आहेत. प्रत्येक निवडणूक आरोप प्रत्यारोप आणि अगदी शारिरीक हल्ले यांनी गाजलेली आहे. बार्शीच्या राजकारणात अलिकडे विकासाला महत्व आले असले तरी पारंपरिक सर्व निकष आजही महत्वाचे ठरतात. बार्शीच्या राजकारणात माजी मंत्री दिलीप सोपल, विद्यमान आमदार राजेंद्र राऊत तसेच भाजपाचीच नेते आणि महाहौसिंगचे माजी सहअध्यक्ष राजेंद्र मिरगणे, सध्या ठाकरे गटातून शिंदे गटात गेलेले माजी पोलीस अधिकारी भाऊसाहेब आंधळकर, नुकतेच राष्ट्रवादीत प्रवेश केलेले माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांच्या भूमिका महत्वाच्या आहेत.

बार्शी तालुक्यात सध्या नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, बाजार समिती यांच्या निवडणुका कोणत्या क्षणी जाहीर होईल अशी परिस्थिती आहे. या निवडणुकीत बार्शी तालुक्यातील वरील नेत्यांमध्ये सत्ता संघर्ष पहायला मिळणार हे नक्की.

### बार्शीच्या विकासाला वळण मिळणार का?

नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायतीच्या आणि विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुकाही चांगल्याच चुरशीने झाल्या आहेत. सध्या राज्याच्या राजकारणाला पवार विरूध्द फडणवीस असे वळण मिळत असून त्याचे पडसाद थेट बार्शीच्या राजकारणावरही उमटणार आहेत. बार्शीमध्ये आगामी काळात महाविकास आघाडी विरूध्द भाजपा अशीच पक्षीय लढत रंगणार आहे. वैरागच्या निवडणुकीने या पक्षीय संघर्षावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे आगामी काळात राज्यातल्या सत्तासंघर्षाचे साधक बाधक परिणाम बार्शीच्या राजकारणावर होणार यात शंका नाही. त्यातून बार्शीच्या विकासाला कसे वळण मिळते, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहेत.